# पंढरी संचार

• पंढरपूर • बुधवार, २७ नोव्हेंबर २०२४ • किंमत ₹ ४ • पाने : ८

NO PAIDNEWS

pandharisanchar.com | RNI-MAH-MAR/1499/2000 | • वर्ष २९ • अंक - १८७




शासनाची मदत घेऊन अप्पर तहसील कार्यालय रद्द करणार-पाटील PII



गुजरात, आंध्र प्रदेश, कर्नाटक राज्यातून डाळिंबाची आवक PIII

## At a Glance

### जिल्ह्याचा पालकमंत्री कोण?



**सोलापूर :** विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी महायुतीला मिळालेल्या अभूतपूर्व यशानंतर आता कोण- कोण मंत्री होणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. सोलापूर जिल्हा हा या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसमुक्त झाल्याचे पाहायला मिळाले. भारतीय जनता पार्टीचे तब्बल पाच आमदार जिल्ह्यात निवडून आले आहेत. सलग पाच वेळा आमदार होण्याचा मान विजयकुमार देशमुख यांनी मिळवला असून, त्यानंतर सलग तीन वेळा सुभाष देशमुख हे आमदार झाले आहेत आणि सलग दोन वेळा अक्कलकोटचे सचिन कल्याणशेट्टी आणि मंगळवेढ्याचे समाधान आवताडे ते आमदार झाले आहेत.

### सोलापुरात 454 ट्रक कांद्याची आवक



**सोलापूर :** सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत सोमवारी कांद्याला प्रतिक्विंटल 7 हजार 200 रुपयांचा दर मिळाला. एका दिवसामध्ये 454 ट्रक कांद्याची आवक होती. येणाऱ्या काळात आवक आणखी वाढण्याची शक्यता आहे. सोलापूर मध्ये जिल्ह्यासह कर्नाटकातील विजयपूर, इंडी, आळंद, कलबुर्गी आदी भागातील माल विक्रीला येत आहे. रविवारी सुट्टी असल्याने सोमवारी आवक वाढली. मागील आठवड्यात कांद्याचा दर 7000 पर्यंत गेला होता. सोमवारी त्यात 200 रुपयांनी वाढ झाली आहे. तसेच सरासरी दर मात्र 2500 रुपये इतका आहे. चांगल्या प्रतीचा माल सध्या कमी येत आहे.

### विडी घरकुलातील आगीच्या घटनेत 25 लाखांचे नुकसान



**सोलापूर :** विडी घरकुल परिसरात असलेल्या मीनाक्षी नगरातील चार गाड्यांना सोमवारी सायंकाळी पावणे सहा वाजण्याच्या सुमारास आग लागली. शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत शेव, फरसाण, पापड आणि चिवडा भस्म झाला असून आग विझवण्यासाठी दीड तास प्रयत्न करण्यात आले. त्यानंतर अग्निशामक दलाकडून एका मागून एक 15 गाड्या पाणी मारण्यात आले. साडेसात वाजण्याच्या सुमारास आगीवर नियंत्रण मिळाले. या घटनेत अंदाजे 20 ते 25 लाख रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

### नोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला

**सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोळकवठा हद्दीमध्ये एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला आहे. याबाबतची नोंद मंद्रूप पोलीस ठाण्यात 24 नोव्हेंबर रोजी झाली आहे. पोलीस उपनिरीक्षक राजू लक्ष्मण डांगे (वय 40 राहणार मंद्रूप, पोलीस ठाणे, सोलापूर ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एका अज्ञात व्यक्तीविरोधात मंद्रूप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विधानसभा बरखास्त ; शिंदे काळजीवाहू मुख्यमंत्री !

# कोण होणार चेकमेट ?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क





**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी लागला आहे. महायुतीला २३९ जागा मिळाल्या आहेत. अत्यंत प्रचंड आणि घवघवीत यश महायुतीला मिळाले आहे. मागच्या तीन दशकात एकाही युती किंवा आघाडीला असे यश मिळवता आले नव्हते.

२३ नोव्हेंबरच्या या निकालावर विरोधकांनी काही प्रमाणात संशय व्यक्त केला आहे. मात्र आता महायुतीसमोरचा पुढचा पेच आहे मुख्यमंत्री कोण? याचा. दरम्यान काल एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. त्यानंतर मंत्रिमंडळ विसर्जित झाले आहे. राजभवनावर पोहचत एकनाथ शिंदे यांनी राज्यपालाकांडे राजीनामा दिला आहे. त्यामुळे १४ वी विधानसभा बरखास्त झाली असल्याने एकनाथ शिंदे हे आता काळजीवाहू मुख्यमंत्री आहेत.

येत्या दोन ते तीन दिवसात निर्णय होण्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे. महायुतीत भाजपाला सर्वाधिक १३२ जागा मिळाल्या आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजपाला सलग तिसऱ्यांदा १०० पार जागांचे यश मिळाले आहे. त्यांच्या नावे हा रेकॉर्डच तयार झाला आहे. तर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला ५७ आणि शिवसेना पुरस्कृत उमेदवारांच्या ४ अशा ६१ जागा मिळाल्या आहेत. अजित पवारांच्या राष्ट्रवादीला ४१ जागा मिळाल्या आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसने मुख्यमंत्री या पदावर दावा सांगितलेला नाही. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले तर आमची काही हरकत नाही असे अजित पवारांच्या राष्ट्रवादीने म्हटले आहे. तर संघानेही देवेंद्र फडणवीस यांच्या नावालाच अनुमोदन दर्शवले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री पदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार? हे पाहणे आता औत्सुकाचे ठरणार आहे.

**नवा मुख्यमंत्री कोण**

• आता सध्या राज्यात चर्चा आहे ती म्हणजे राज्याचा नवा मुख्यमंत्री कोण होणार? मुख्यमंत्री पदाच्या शर्यती मध्ये भाजपाकडून देवेंद्र फडणवीस, शिवसेनेकडून एकनाथ शिंदे, राष्ट्रवादीकडून अजित पवार यांच्यामध्ये सुरु आहे. आपला नेता मुख्यमंत्री झाला पाहिजे अशी तिन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांची इच्छा आहे. देवाला साकडे तर कुठे दुग्धअभिषेक घालण्यात येत आहे.

## पशु गणनेस सुरुवात; कत्तल केंद्रे व मांस विक्रेत्यांची होणार नोंद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** राज्यात 25 नोव्हेंबर पासून पशु गणनेस सुरुवात करण्यात आली आहे. ही गणना 28 फेब्रुवारी 2025 पर्यंत सुरू राहणार आहे. या गणनेमध्ये 16 प्रकारच्या पशुंची गणना करण्यात येणार आहे. तसेच पहिल्यांदाच कत्तल केंद्रे व मास विक्रेत्यांची नोंद करण्यात येणार आहे. पशुगणना करण्यासाठी शहरी भागात 4000 कुटुंबासाठी एक प्रगनक कार्यरत असेल तर दहा प्रजननकामागे एक पर्यवेक्षक असणार आहे. ग्रामीण भागात 3000 कुटुंबामागे एक प्रगनक असेल. या पशुगणनेसाठी अद्यावत सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील सर्व तालुका व गाव स्तरावर पशुवैद्यकीय खात्याने नियोजन करून तयारी पूर्ण केली आहे. एखाद्या रोगाचा प्रसार झाल्यास तो आटोक्यात आणण्यासाठी पशुवैद्यकीय खात्यास लसीकरण करावे लागते. यासाठी किती जनावरे आहेत. याची माहिती असणे गरजेचे आहे. तसेच नैसर्गिक आपत्ती आल्यास जनावरांचा मृत्यू झाल्यास संबंधित पशुपालकाला शासकीय मदत देण्यासाठी आकडेवारी असणे गरजेचे आहे. यासाठी यंदाच्या पशुगणनेमध्ये 16 प्रकारच्या पशूंची गणना करण्यात येणार आहे. तसेच यामध्ये कत्तल केंद्रे व मांस विक्रेत्यांची नोंद पहिल्यांदाच करण्यात येणार आहे. यामुळे शासनाला दररोज किती टन मांसची विक्री केली जाते. याची माहिती मिळणार आहे. यंदाची पशु गणना अध्यावत पद्धतीने करण्यात येणार आहे. यामुळे याची संपूर्ण माहिती शासनापर्यंत पोहोचणार आहे.



### शिंदेंनी घेतली पवार यांची भेट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**करमाळा :** करमाळ्याचे माजी आमदार संजयमामा शिंदे यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मुंबईत भेट घेतली आहे. माजी आमदार शिंदे हे अजित पवार यांचे समर्थक आहेत. विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. निवडणूक निकालानंतर त्यांनी पहिल्यांदाच पवार यांची भेट घेतली. या भेटीनंतर सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात नव्या चर्चा सुरु झाल्या आहेत. माजी आमदार शिंदे हे पवार यांचे समर्थक आहेत.करमाळ्यात ते कार्यकर्त्यांच्या आग्रहाने अपक्ष निवडणूक रिंगणात होते. अजित पवार यांनी स्वतः करमाळ्यात ‘लाडकी बहीण’ मेळावा घेतला होता.

## डॉ. देशमुखांची भरारी; भाजपाच्या व्दारी !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सांगोला :** सांगोला विधानसभा मतदार संघातून शिवसेनेचे शिंदे गट उमेदवार शहाजीबापू पाटील तसेच उबाठा गटाचे दीपक आबा साळुंखे-पाटील आणि शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने उभा राहिलेले बाबासाहेब देशमुख यांच्या अटीतटीच्या लढतीत अल्पशा मतावर का होईना डॉ. देशमुख यांनी यश संपादन केले. सांगोला तालुका हा कांही वर्षापासून जसा दुष्काळी समजला जातो तसा उद्योगधंद्याच्यार्दृष्टीनेही मागास गणला जातो. सांगोला परिसरातील डाळींब देशभर पोहोचले असले तरी अलीकडे विविध नैसर्गिक आपत्तीमुळे डाळींबाच्या पिकावरही अनिष्ट परिणाम होत असल्याचेही दिसून येत आहे. ही जाणीव ठेवून विजयाची पताका फडकवणारे डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी सांगोला तालुक्यातील तरुणांच्या हाताला काम द्यायचे असेल, विविध प्रकारचे उद्योग आणायचे असतील तर विविध योजनांच्याव्दारे सरकारकडून आर्थिक पाठबळ मिळविणे गरजेचे असते.हाच उद्देश पुढे ठेवून डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी महायुतीचा सर्वात महत्वाचा घटक पक्ष असलेल्या भाजपाला पाठिंबा देण्याची भूमिका घेऊन आज सकाळी त्यांनी मुंबई येथे भाजपाला अर्थात देवेंद्र फडणवीस यांना पाठिंबा दिल्याचे जाहीर केले. यामुळे गेल्या कित्येक वर्षाच्या शेतकरी

## दादांच्या कर्तुत्वाचे एकनिष्ठ शिलेदाराने लावले बॅनर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**पंढरपूर :** अजित पवार यांनी त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस सह महायुतीच्या उमेदवारांचा चोरकस प्रचार करत घवघवीत यश मिळवून दिले. कदापे त्यांच्या एकट्याच्या बळावर राष्ट्रवादीचे 41 आमदार निवडून आणत राष्ट्रवादी काँग्रेस वर आपले प्रभुत्वा असल्याचे सिद्ध केले. त्यामुळे त्यांचे कौतुक करणारे बॅनर्स आणि ठिकाणी लागत असताना पंढरपूरमध्ये त्यांचे एकनिष्ठ शिलेदार असलेले श्रीकांत शिंदे यांनी लावलेला आता कसं वाटतंय हा बॅनर सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसची बहुमोल मदत झाल्यामुळे महायुतीला देखील मोठे यश मिळाले या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसचे जवळपास सर्वच नेते शरद पवार यांच्याकडे गेले परंतु श्रीकांत शिंदे यांनी एक हाती किल्ला लढवला. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या नेतृत्वाखाली रूपालीताई चाकणकर आमदार शिवाजीराव गरजे तसेच जिल्हा राष्ट्राच्या पदाधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क ठेवून त्यांनी येथे सूक्ष्म प्रचार यंत्रणा राबवली आणि महायुतीचे उमेदवार समाधान आवताडे यांच्या विजयामध्ये खारीचा वाटा उचलला. अजित पवार यांचे राष्ट्रवादी येथे औषधालाही शिल्लक राहिली नसताना शिंदे यांनी एकट्यांनी किल्ला लढवून येथे यशस्वी आणि विजयी उमेदवारांमध्ये राष्ट्रवादीचा मोठा वाटा असल्याचे सिद्ध केले.


महाराष्ट्र टाइम्स - सूडाचा रक्तरंजित वारसा ! ★★★

Pune Mirror - A complete entertainment package

अल्ट्रा मराठी बज - जबरदस्त ॲक्शन आणि श्वास रोखणारा थरार !

लोकमत फिल्मी - बॉलीवूड स्टाईल जबरदस्त चित्रपट

मराठी मनोरंजन विश्व - बॉलिवूड आणि साऊथ सिनेमाला टक्कर देणारा 'मराठी अँक्शनपट' ★★★★

प्लॅनेट मराठी - सूड, मैत्री, सत्ता, विश्वासघाताचा रक्तरंजित प्रवास 'रानटी' ★★★

लोकमत - टाळ्या, शिट्ट्या आणि पैसा वसूल 'रानटी' चित्रपट ★★★

नवराष्ट्र - कला, दिग्दर्शन , लेखन, संगीत, पार्श्वसंगीत, साहसी दृश्ये यांचा उत्तम मेळ




सिटिप्राईड : मंगला ७.३० ; सिटीप्राईड सातारा रोड रा. ८.००; कोथरुड २.००, १०.००; आर डेक्कन ७.१५; रॉयल पिंपळे सौदागर रा. १०.००

Cinépolis : सिझन मॉल ४.३०, ९.००, १०.००; वेस्ट एन्ड औंध १.३०, ८.१५;

PVR INOX : पिव्हीआर/आयनॉक्स सिनेमाज : मार्केटसिटी पुणे २.२०, ८.३५, १०.४५; पॅव्हेलियन १२.१५, ५.४५; ग्रँड हायस्ट्रीट हिंजवडी २.००, ८.०५; डीसी कोपा १२.००, ५.१०; कुमार पॅसिपीक पुणे १.३०, ७.५०; बंड गार्डन पुणे ३.४५, १०.१५; जयगणेश पिंपरी ९.३०, ३.५०, १०.१०; रॉयल हेरीटेज मॉल पुणे ९.३५, ३.४५, १०.३०; पीएमसी वाकड १.२०, ४.२०, ७.४०, १०.४०, एल्प्रो चिंचवड १२.४०, ७.००;

Abhiruchi : अभिरुची सिटीप्राईड सिंहगड रोड २.१५, १०.००

फनटाईम सिंहगड रोड १२.३०, ३.००, १०.३०

फनटाईम पिंपरी १२.३०, ३.००, १०.३०

राहुल पुणे १.००, १०.३०

E - SQUARE : बॉलीवुड खराडी रा. ८.४५, इलाईट झॉन हिंजवडी ४.००

वैभव हडपसर १.१५, ९.४५

राजहंस फातिमानगर १२.००,७.००

अशोक पिंपरी ३.३०

विशाल पिंपरी १.३०, १०.३०

फनकेअर गोतावडे फाटा ७.००

तारा बारामती १.००, ९.;३०

MIRAJ : स्पाईन मॉल भोसरी १२.४५, १०.००

MOVIE MAX : अमानोरा ४.३०, ८.४५; मारीप्लेक्स ४.००

विलक्स खडकी ६.३०

वसंत सिनेप्रो १२.३०, १०.००

राहुल इंदापूर १२.००

सुभद्रा बारामती ३.१५, ९.००; शिवाजी तळेगाव; स्वामी समर्थ जेजुरी १२.००, ९.००; नवनाथ वणेवाडी १२.००, ९.००; डिजी गोल्ड नोवा शिरुर ६.३०; शेवंता जुन्नर ३.००, ६.००; आशिष निरा १२.००, ६.००; सत्यम राजगुरुनगर ३.००, ६.००; गुंजन शिखरापूर १.००, ७.००; गुंजन कारेगाव ३.००, ६.००; गुंजन न्हावरे ३.००, ९.००; लक्ष्मी नारायणगाव ३.००; सिनेब्लिज नीलकमळ लोणावळा ३.३०


### यंदा विक्रमी मतदारांची 'नोटाला' पसंती

# मतदारांनी केली मतपेटीतून नाराजी उघड

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळाले. यामध्ये महायुतीला २३० विक्रमी जागा मिळाल्या तर मविआला ४६ जागांवर समाधान मानावे लागले एवढेच नव्हे तर महाविआकडे आता विरोधीपक्ष नेता सुद्धा नसणार.परंतु यंदाच्या विधानसभेत तब्बल विक्रमी मतदारांनी नोटा पसंती दिल्याने अनेक दिग्गज नेत्यांचे आमदारकीच स्वप्न भंगले म्हटले तर वावगे ठरणार नाही.लोकसभेला अब की बार चारसो पार चा नारा गाजला होता. त्यामध्ये भाजप पक्षासह घटक पक्षाला मिळून ३०० शे आकडा पार करता आला नाही त्यांना फक्त २८२ जागांवर समाधान मानावे लागले. लोकसभा निवडणुकीत तब्बल देशात ६० लाखाहून अधिक मतदारांनी नोटाला पसंती दिली होती. २० नोव्हेंबर रोजी झालेल्या राज्यातील विधानसभेमध्ये एक लाखाहून मतदारांनी नोटाला पसंती दिली आहे. गेल्या पाच वर्षात राज्यात फोडाफोडीचे राजकारण तसेच एकमेकांवर खालच्या पातळीवर केले गेलेले आरोप-प्रत्यारोप व पक्षातील अंतर्गत गटबाजीमुळे फुटलेले शिवसेना- राष्ट्रवादी पक्ष यामुळे मतदारांनी नाराजीचा सुर उमटत होता. निवडणुकीत उमेदवारी मिळवण्यासाठी एका पक्षाला सोडचिठ्ठी देऊन दुसऱ्या पक्षात प्रवेश, मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी होणारा पैशाचा वापर यामुळे सर्वसामान्य मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजी निर्माण झाली होती, परिणामी नोटाला मतदान करण्याचा पर्याय जागरुक मतदार निवडतात, पण लोकसभेपेक्षा विधानसभा निवडणुकीसाठी झालेल्या मतदानात तुलनेत कमी मतदारांनी नोटाच्या बटणाचा पर्याय स्वीकारला असल्याचे मतदानाच्या आकेडवारीवरून दिसून आले आहे. निवडणूक रिंगणात असलेल्या कोणत्याही राजकीय पक्षाचा उमेदवार मतदाराला आवडत नसले तर अशा मतदारांनासाठी निवडणूक आयोगाने नोटाच्या बटणाचा पर्याय दिला आहे. नोटा म्हणजे ‘नन ऑफ दी अबाऊव्ह’ असा अर्थ होतो. ईव्हीएमवर सर्व उमेदवारांचे नाव व पक्ष चिन्हाच्या खाली नोटाच्या बटणाचा पर्याय असतो. २००९ मध्ये निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाला नोटाचा पर्याय मतदारांना उपलब्ध करून देण्याबाबतची माहिती दिली. त्यानंतर नागरी हक्क संघटना पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टिज या स्वयंसेवी संघटनेने नोटाचे समर्थन करणारी जनहित याचिका २०१३ मध्ये न्यायालयात दाखल केली. त्यानंतर २०१३ मध्ये न्यायालयाने मतदारांना नोटाला पर्याय देण्याचे आदेश दिले. राज्यात सर्वात जास्त म्हणजे मुंबईतील ३६ विधानसभा मतदारसंघांत ७० हजारांहून अधिक मतदारांनी हक्क बजावताना ‘नोटा’ मतांना पसंती दिली. यामध्ये सर्वाधिक नोटा मते अणुशक्तीनगरमध्ये असून त्याची संख्या ३,८८४ आहेत तर सगळ्यात कमी नोटा मते मानखुर्द शिवाजी नगरमध्ये असून त्यांची संख्या फक्त १३० आहे. उमेदवाराबाबत नाराजी आणि नापसंती दर्शवण्यासाठी मुंबईकरांनी ‘नोटा’ पर्याय स्वीकारलेला दिसून आले. मुंबई शहर जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी १३ लाख ३९ हजार २९९ नागरिकांनी मतदान केले तर मुंबई उपनगरात ४३ लाख ३४ हजार ५१३ नागरिकांनी मतदान केले. त्यामुळे एकूण मतदारांपैकी जवळपास १.२४ टक्के लोकांनी नोटाचा पर्याय स्वीकारला आहे.

पंढरी संचार

**करमाळा :** करमाळ्यात अपक्ष उमेदवार संजयमामा शिंदे यांच्या नावाशी साधर्म्य असलेले संजय शिंदे नावाचे दोन उमेदवार होते. त्या दोघांना मिळून २१५४ मते मिळाली आहेत. माढ्यातून अभिजित पाटील यांचा ३० हजारांच्या तर करमाळ्यातून नारायण पाटील यांचा १६ हजारांच्या मताधिक्याने विजय झाल्याने या दोन्ही ठिकाणी सेम नेमचा फॉर्म्युला या निवडणुकीत फेल गेल्याचे दिसले.


## अप्पर तहसील मुळे राजन पाटलांच्या विरोधात रोष; परिणामी उमेदवार पडला

# शासनाची मदत घेऊन अप्पर तहसील कार्यालय रद्द करणार-पाटील

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** माजी आमदार राजन पाटील यांच्या विरोधामध्ये अप्पर तहसील कार्यालयामुळे रोष होता, त्यांच्या विरोधामध्ये जनमत गेले होते, ही गोष्ट मी अजित पवार यांच्या लक्षात आणून दिली होती, मात्र यांनी न ऐकल्याने मी पक्ष प्रवक्ते पदाचा राजीनामा दिला होता, मात्र सदस्यत्वाचा राजीनामा दिला नव्हता. त्या रोशामुळे अजित दादांचा उमेदवार पडला आणि आमचा उमेदवार विजयी झाला , तथापि येणाऱ्या काळात अप्पर तहसील रद्द करण्यासह जनतेला इतर दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाची मदत घ्यावी लागणार असून विशेष करून उपमुख्यमंत्री अजित पवार यांचीही मदत लागणार असून अपर तहसील रद्द करण्याची मागणी करणार असल्याची माहिती राष्ट्रवादीचे माजी प्रवक्ते उमेश पाटील यांनी दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी मुख्य प्रवक्ते उमेश पाटील हे माध्यमांशी बोलताना पुढे म्हणाले की, मोहोळ तालुक्यामध्ये गेल्या ३० वर्षापासून माजी आमदार राजन पाटील यांच्याकडे निरंकुश सत्ता असल्याने अन्याय अत्याचार वाढले होते. यातच त्यांनी मोहोळ येथील दुय्यम निबंधक कार्यालय ठाणे अप्पर तहसील कार्यालय आहे दोन भागातशासकीय कार्यालय अनगर येथे घेऊन गेल्याने जनतेमध्ये प्रचंड असंतोष आणि रोष निर्माण झाला होता. त्यांच्या विरोधामध्ये जनमत असल्याने त्यांचा उमेदवार निवडून येणार नाही, असे मी वारंवार अजित दादा पवार यांना सांगितले होते. राजन पाटील यांचा तुतारीकडे जाण्याचा कल आहे, त्यामुळे पक्षाचा उमेदवार निवडून आणण्याची जबाबदारी घेतो, मात्र त्यांनी ऐकले नाही. आम्ही घड्याळाकडे असतो



तरीही हीच परिस्थिती राहिली असती उलट लाडकी बहीण आणि अंडर करंट यामुळे ६० हजारच्या पुढे मताधिक्य गेले असते, असे म्हणत अप्पर तहसील कार्यालय विरोधात तालुक्यातील सर्वपक्षीय नेते व जनता पेटून उठले होते. आणि हेच कारण राजन पाटील यांच्या विरोधामध्ये सर्व एकत्र यायला कारणीभूत ठरले. मी सुद्धा पक्षप्रवक्ते पदाचा राजीनामा देऊन पूर्ण ताकतीने या लढाईमध्ये सर्वांना घेऊन उतरलो होतो. पवार कुटुंबीयांचा मी निष्ठावंत कार्यकर्ता आहे अजित दादांना मी आजही मानतो पण स्थानिक स्तरावर मोहोळ तालुका गुलामगिरीत होता म्हणूनअखेर भारताला स्वातंत्र्य होऊन ७५ वर्षे होऊन गेली असली तरी २३ नोव्हेंबर हा तालुक्याला खरा स्वातंत्र्य मिळवून देणारा दिवस असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विजयानंतर अभिनंदनासाठी मला व उमेदवार राजू खरे यांना फोन आला होता, असे सांगत जय पराजय हा मोठ्या मनाने स्वीकारायचा असतो. खरेतर विजयी उमेदवाराचे अभिनंदन करण्यासाठी राजन पाटील यांचा सुद्धा फोन येणे अपेक्षित होते, मात्र वारसा हक्काने राजकारणात आलेल्या नेत्यांना हे राजकारण कळणार नाही, असेही उमेश पाटील यांनी पुढे बोलताना सांगितले.

## अर्वाच्य भाषा वापरल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** मतमोजणीनंतर अतिउत्साही शेकाप कार्यकर्त्यांनी हातात वाघसदृश खेळणे धरून त्याच्या पार्श्वभागात लाकडी काठी घालून पराभूत उमेदवार शहाजीबापू पाटील व दीपक साळुंखे यांच्याबद्दल हात इशारे करत अश्लील वक्तव्य केल्याप्रकरणी पोलिसांनी दोघांवर गुन्हा दाखल केला. याबाबत, शांताराम श्रीमंत यादव (रा. गार्डी, ता. पंढरपूर) यांनी फिर्याद दिली असून याप्रकरणी सचिन उर्फ अशोक प्रभू शिंदे, नवनाथ बाबुराव सरगर (दोघेही रा. पळशी, ता. पंढरपूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सर्व निवडणुका महायुती म्हणूनच लढणार



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**करमाळा :** पडत्या काळातही करमाळा विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी आमच्यावर विश्वास टाकला असून येणाऱ्या सर्व निवडणुका आम्ही महायुती म्हणूनच लढणार आहोत, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते दिग्विजय बागल यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले आहे. २०२९ च्या विधानसभा निवडणूकीसाठी आपण तयारी सुरु करत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले आहे. करमाळा विधानसभा निवडणुकीत दिग्विजय बागल हे महायुतीचे उमेदवार होते. त्याचा या निवडणुकीत पराभव झाला आहे. त्यांना साधारण ४१ हजार मते मिळाली आहेत.

Selected

## काँग्रेस कमिटी तर्फे संविधान दिनानिमित्त अभिवादन



**सोलापूर :** सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने संविधान दिनानिमित्त भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतन नरोटे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यातआले. यावेळी संविधान प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. यावेळी महिला अध्यक्ष प्रमिला तूपलवंडे, प्रदेश सरचिटणीस संजय हेमगड्डी, माजी महापौर सुशीला आबुटे, एन. के. क्षीरसागर, सुरेश पाटोळे, मयूर खरात, राजन कामत, पशुपती माशाळ, लखन गायकवाड, अनिल मस्के तिरुपती परकीपंडला, सुमन जाधव उपस्थित होते.

## शहिदांच्या स्मरणार्थ प्रशासनाकडून रक्तदान शिबिर



**सोलापूर :** मुंबई दहशतवादी हल्ल्यातील शहीद जवानांच्या स्मरणार्थ पंढरपुरात पोलीस प्रशासनाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील महाविद्यालयीन तरुण-तरुण, गणेशोत्सव मंडळ आणि सामाजिक संघटनातील तरुणांना एकत्रित घेऊन पोलिसांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले. पोलीस उपाधीक्षक डॉ अर्जुन भोसले यांच्या संकल्पनेतून एक थेंब. शहिदासाठी, या विचारातून ११०० रक्तदात्यांचे रक्तदान पूर्ण करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

## क्रीडा सप्ताहाचे उदघाटन

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सोलापूर :** माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ, पुणे संचलित बी. एफ. दमाणी प्रशालेत क्रीडा सप्ताहाचे उदघाटन माजी रणजी क्रिकेटपटू शिवा अकलूजकर यांच्या हस्ते झाले. या समारंभाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करुन, क्रीडा-साहित्य व मैदान पूजनाने झाली. प्रशालेतील राष्ट्रीय खेळाडूंनी क्रीडाज्योत पथकाचे नेतृत्व केले. प्रशालेतील विद्यार्थ्यांनी बहारदार संचलन करुन मान्यवरांना मानवंदना दिली. यावेळी खेळाडूंनी साहित्य कवायत, सूर्यनमस्कार, दांडपट्टा व अरेबिक नृत्याचे बहारदार सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

## तृतीयपंथी मतदारांचे फक्त ३७ टक्के मतदान



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** जिल्ह्यात ३१० तृतीयपंथी नोंदणीकृत मतदार आहेत. तृतीयपंथींनी मतदार यादी नावे नोंदवावीत यासाठी स्वतंत्र अभियान राबविण्यात आले होते. मात्र प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेत सहभागी होण्यात तृतीयपंथी मतदारांनी रस दाखविलेला नाही. जिल्ह्यात एकूण मतदान ६७. ७२ झाले असताना तृतीयपंथीच्या मतदानाची टक्केवारी मात्र ३७ टक्केच आहे. शासनाने तृतीयपंथीं यांच्यासाठी कोणत्याही ठोस योजना आखल्या नसल्याने हा परिणाम झाला आहे.

## नरसय्या आडमांची राजकारणातून निवृत्तीची घोषणा

**सोलापूर :** सोलापूरचे माजी आमदार तथा माकपचे ज्येष्ठ नेते नरसय्या



आडम यांनी राजकारणातून निवृत्ती घेतली आहे. आपण राजकारणातून निवृत्त होत असल्याची घोषणा त्यांनी आज सोलापुरात पत्रकार परिषदेत केली. सोलापूर मध्य विधानसभा निवडणुकीत चौथ्यांदा त्यांचा पराभव झाला होता. अखेर त्यांनी आपण राजकारणातून निवृत्त होत असल्याचे आज सांगितले. मात्र आपण सामाजिक चळवळीत कार्यरत राहणार असल्याचे ते म्हणाले. दरम्यान, आडम यांची एक उत्कृष्ट वक्ता, चळवळीतील लढवय्या नेता म्हणून देशभरात वेगळी ओळख आहे. आगामी काळात तरुण नेर्तृत्व पुढे आणून त्यांना ताकद देवून पक्ष संघटना मजबूत करण्याची भूमिका घेतली जाईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.




## गणेशगांव येथील कवयित्री नूरजहाँ शेख यांना काव्य सम्राज्ञी पुरस्कार जाहीर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माळशिरस :** माळशिरस तालुक्यातील पुर्व भागातील गणेशगांव येथील कवयित्री नूरजहाँ फकरूद्दीन शेख यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्यिक विचार मंचाच्या वतीने काव्य सम्राज्ञी पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे.त्यामुळे माळशिरस तालुक्यात साहित्य क्षेत्रात सर्वत्र आनंदाचे वातावरण पसरले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्यिक विचारमंच महाराष्ट्र रत्नागिरी शाखा पुणे जिल्हा यांच्या वतीने आयोजित केलेल्या उपक्रमात नूरजहाँ शेख यांनी कविता पाठवली होती. त्यांचा कवितेतील उत्कृष्ट लिखाणाबद्दल काव्य सम्राज्ञी पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे.त्यामुळे नूरजहाँ शेख यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.त्या ग्रामीण भागातील महिला कवयित्री आहेत त्यांनी कविता लिखाणाचा छंद जोपासला आहे. त्यांचे हिंदी व मराठी भाषेतून कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत.त्यांच्या उत्कृष्ठ लेखणी ला काव्य सम्राज्ञी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला मनोज जाधव (संस्थापक अध्यक्ष) भावना खोब्रागडे (सहसंस्थापिका संपादिका) जयद्रथ आखाडे (कार्याध्यक्ष पुणे) अल्पेश सोनवणे (ग्राफिक्सकार पुणे जिल्हा) यांनी त्यांच्या लेखणीस पुरस्कार दिला आहे. कवयित्री नूरजहाँ शेख यांचे प्राथमिक ते उच्च माध्यमिक शिक्षण माळीनगरच्या दि मॉडेल विविधांगी प्रशालेत झाले आहे. पदवी पर्यंतचे शिक्षण अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयात झाले आहे तर उच्च पदवीत्तर शिक्षण पंढरपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात झाले आहे.

## 11 हजार मतदारांनी वापरला नोटाचा अधिकार

**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील अकरा हजार मतदारांनी नाकारले



सर्वच उमेदवार, निवडला 'नोटा'चा पर्याय निवडला. जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात 184 उमेदवारांना नाकारून 11 हजार 488 मतदारांनी निवडला नोटाचा पर्याय वापरला. जिल्ह्यातील अकरा विधानसभापैकी सांगोला मोहोळ मतदार संघात नोटा राहिला चौथ्या स्थानावर आहे. 2019 साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत बारा हजार मतदारांनी निवडला होता नोटाचा पर्याय वापरला होता. मोहोळ मतदार संघात सर्वाधिक दोन हजार हून अधिक मतदारांनी नोटाला मतदान केलं होतं.




## माळशिरस तालुक्यातील श्रीराम शिक्षण संस्था संचलित

# श्रीराम इंग्लिश स्कूलमध्ये 'संविधान दिन' उत्साहात साजरा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** मंगळवार दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी श्रीराम शिक्षण संस्था संचलित , श्रीराम इंग्लिश स्कूल ,पानीव या मध्ये 'संविधान दिन' साजरा करण्यात आला.२६ नोव्हेंबर, १९४९ रोजी देशाच्या संविधान सभेने राज्यघटना स्वीकारली. हा तो दिवस आहे, जेव्हा संविधान तयार झाले. जगातील सर्वात मोठी लोकशाही जन्माला आली. संविधान दिनालाच 'राष्ट्रीय विधी' दिन असेही म्हणतात.

भारतीय संविधानातील प्रमुख हक्क, कर्तव्ये, निर्मिती, समिती,विशेषता यावर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. सतीश घुले सर आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. अशोक देशमुख सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थी - विद्यार्थिनींनी ही भारतीय संविधानावर आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी स्कूलच्या प्राचार्या मा.श्री. सौ. रेणुका जावळे आणि प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन



सौ.प्रीती घुले मॅडम यांनी केले.

सदर कार्यक्रमास श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. प्रकाश (बापू )पाटील, मार्गदर्शक आदरणीय सौ. श्रीलेखा(Maa) पाटील ,सचिव (adv.) मा .श्री. अभिषेक (भैय्या) पाटील, उपाध्यक्ष मा. श्री. करण (भैय्या)पाटील, सहसचिव माननीय डॉ. समीर पवार, विशेष कार्यकारी अधिकारी दिनेश ( आप्पा )शिंदे, भाऊसो वनवे , विनोद बाबर ,प्रमोद झगडे, स्कूलच्या प्राचार्या रेणुका जावळे तसेच शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

**सोलापूर :** केगाव येथील एनबीएन सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात आज मंगळवारी सकाळी संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच 26 / 11 मुंबईवर झालेल्या भ्याड हल्ल्यात शहीद झालेल्यांना अभिवादन केले. यावेळी प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या हस्ते संविधानाच्या उद्देशिका प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. आर. टी. व्यवहारे यांनी संविधानाबाबत माहिती दिली. संविधान निर्मिती, समिती, अनुच्छेद, विशेषता, कर्तव्ये यावर मार्गदर्शन केले.

### ३४ कारखान्यांपैकी ९ साखर कारखाने चालू

# जिल्ह्यात २ लाख ४९ हजार क्विंटल साखर उत्पादन

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** सन 2024 25 चा साखर कारखान्याचा गाळप हंगाम सुरू झाला असून जिल्ह्यातील 34 पैकी नऊ साखर कारखाने सुरू झाले आहेत. या साखर कारखान्यांनी तीन लाख 41 हजार 486 टन उसाचे गाळप केले असून दोन लाख 49 हजार क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे. राज्यातील साखर कारखान्याचा गाळप हंगाम शुभारंभ १ नोव्हेंबर पासून सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. मात्र या कालावधीमध्ये जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू होती अनेक साखर कारखानदार या निवडणुकीत उभे होते. यामुळे गाळप हंगाम पुढे ढकलावा अशी मागणी नेत्यांनी केली होती. याची दखल साखर आयुक्तांनी घेऊन गाळप हंगाम पुढे ढकलला. साखर कारखान्याचा गाळप हंगाम १५ नोव्हेंबर पासून सुरू झाला आहे. सोलापूर जिल्ह्यात असलेल्या 34 साखर कारखान्यापैकी ९ साखर कारखान्यांनी गाळप हंगाम सुरू केला आहे. या कारखान्यांनी तीन लाख 41 हजार 486 टन उसाचे गाळप करून दोन लाख 49 हजार 250 क्विंटल साखरेचे उत्पादन केले आहे. सरासरी साखर उतारा 7.3% मिळाला आहे. जिल्ह्यातील इतर साखर कारखाने लवकरच सुरू होणार आहे. यामुळे साखर कारखान्याचा गाळप हंगाम लवकरच जोमाने सुरू होणार आहे. यंदाच्या वर्षी 100 ते 120 दिवस साखर कारखान्याचा गाळप हंगाम सुरू राहील असा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

उर्वरीत साखर कारखाने लवकरच सुरु होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे सोलापूर जिल्हयात यंदा साखरेचे उत्पादन विक्री होणार असल्याचे दिसून येत आहे. काही साखर कारखान्यांना गाळप परवाना मिळाला नाही. तो लवकरच मिळणार असल्याचे सांगण्यात येते. जिल्ह्यातील सर्वच्या सर्व साखर कारखाने सुरु होणार असल्याने विक्रमी उत्पादन होणार आहे.

### अक्कलकोटवासीयांना लाल दिव्याच्या गाडीचे वेध



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अक्कलकोट :** सातवी विधानसभा निवडणुक लढविणारे काँग्रेसचे माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या मदतीला पोलादी पुरुष अशी ओळख असलेले भाजपाचे माजी आमदार सिद्रामप्पा पाटील जि. प. चे माजी उपाध्यक्ष शिवानंद पाटील रमेश पाटील दिमतीला असतानाही भाजपा सोलापुर जिल्हा पुर्व अध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी म्हेत्रे यांचा दुसऱ्यांदा मोठया मताधिक्याने पराभव केला. २५० अक्कलकोट विधानसभा मतदार संघाच्या इतिहासात सर्वाधिक ३८, ००० मताधिक्य कल्याणशेट्टी यांच्या नावावर असलेला विक्रमही आ. कल्याणशेट्टी यांच्या नांवावर आहे.

Selected

## सुहास कुलकर्णी यांचे निधन



**पंढरपूर :** पंढरपुरातील सुहास कुलकर्णी इचगावकर (वय 64) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन विवाहित मुली, दोन भाऊ असा परिवार आहे. हिंदू महासभेचे नेते अभयसिंह कुलकर्णी-इचगावकर यांचे ते भाऊ होते.

## त्यांच्या छताडावर बसून निधी आणणार - जानकर

**माळशिरस :** माझ्या मतदारसंघाच्या विकासाच्या आड कोणी आल्यास त्याच्या छताडावर बसून निधी आणणार असल्याचा इशारा माळशिरस विधानसभा मतदारसंघाचे शरद पवार गटाचे आमदार उत्तम जानकर यांनी दिला आहे. राज्यात पुन्हा महायुती सत्तेत आली ती केवळ लाडक्या बहिणींमुळे अशी कबुली देखील उत्तम जानकर यांनी दिली. लाडक्या बहिणींचा अंडर करंट समजू शकला नाही, त्यामुळेच भाजपाला यश मिळाल्याचे जानकर म्हणाले.

पाहिजे
हॉस्पिटल मध्ये स्टाफ आणि मावशी
शिक्षण:- ANM \ GNM \ १२ वी पास
पत्ता:- कोडलकर हॉस्पिटल
लिंक रोड,पंढरपूर
फोन नंबर :- ८२९१३१५०८९

## प्रणिती शिंदे दिल्ली दरबारी दाखल



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, प्रदेश कार्याध्यक्ष खासदार प्रणिती शिंदे यांनी आज दिल्ली येथे काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत महाराष्ट्रातील खासदार उपस्थित होते. यावेळी विविध राजकीय मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. तसेच विधानसभा निवडणुकीतील काँग्रेसच्या पराभवाबद्दल चर्चा करण्यात आली.

सोलापूर जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणूकीत काँग्रेस पक्षाला पराभवाला सामोरे जावे लागले. या निवडणूकीमध्ये खा. प्रणिती शिंदे व खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी माढा व पंढरपूर-मंगळवेढा मतदार संघात प्रचाराची धुरा सांभाळत आपापल्या परीने प्रयत्न करुनही यश मिळाले नाही. याबाबतही चर्चा करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले.

## मिरवणूक...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**माढा :** माढा विधानसभा मतदार संघात विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील हे निवडून आल्याबद्दल आज माढा शहरात विजयी मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणूकीत हजारो कार्यकर्ते व नागरिक सहभागी झाल्याचे दिसत आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकोना या जाहीर नोटीसीने कळवण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही जाफर महिबुबसाब शेख यांची मालकी हक्क वहिवाटीची होती. सदर मिळकत हि विद्यमान मालक मेहबूब जाफर शेख यांचे नावावर ते जाफर महिबुबसाब शेख यांचे वारस म्हणून आलेली आहे व त्यांनी सदर मिळकत ही पिरामल कॅपिटल अड हाउसिंग फायनान्स शाखा-पंढरपूर यांचे कडे कर्ज मागणी केलेली आहे आणि त्या करीता सदर मिळकत ही तारण गहाण म्हणून ठेवून घेवून आमचे कंपनीने कर्ज देण्याची तयारी दर्शवली आहे. सदर परिशिष्टात नमूद केली मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निजोखमी असलेचा भरवसा सदरील विद्यमान वहिवाटदार मालक यांनी आमचे अशील कंपनीस दिलेला आहे. तरी सदरील मिळकती मध्ये कोणाचाही, कसलाही प्रकारचा मालकी हक्क, वारस हक्क, हितसंबध, गहाण, दान, लीज, लीन, भाडे पट्टा, मुखत्यार पोटगी, खंड, नोकरनामा, अदला बदल दस्त, करारनामा, बक्षिसपत्र इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क वा अधिकार असल्यास त्यांनी त्या बाचतीत खालील पत्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसाचे आत सर्व संबधित कागदपत्र व पुराव्यासह आमचेकडे लेखी हरकत कळवून पोहोच घ्यावी. सदरील मुदतीत कोणताही हरकत न आलेस सदर मिळकत ही निर्वेध, निजोखामी व बोजाविरहित असल्याचे आणि त्या कोणाचा हक्क हितसंबध असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे. असे गृहीत धरून आमचे अशील कंपनी सदर मिळकत कर्ज प्रकरणाकरीता तारण म्हणून गहाणखताचा दस्त पूर्ण करतील व तद्नंतर आलेली कोणाचीही, कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.
मिळकतीचे वर्णनः डी. सोलापूर. सब.डी. व ता. मंगळवेढा पैकी मौजे संत दामाजी नगर येथील मिळकत ग्रा. पंचायत मालमता क्र.२३९५ क्षेत्र ११४० चौ. फुट (खुली व बांधीव )
पूर्व :- रस्ता
दक्षिण :- रस्ता
पश्चिम :- सलिम शेख यांची जागा
उत्तर:- दाजी घुले यांची जागा
(येणेप्रमाणे मिळकत आतील दगड, माती, झाड, झुडूप व तदंगभूत वस्तू हक्कासह)
ता.२६/११/२०२४

सही/-
अशिलातर्फे अॅड. रणजित एन. शिंदे
R.NO.MAH/3995/2012
पंढरपूर

### वाहनाच्या धडकेत मायलेकींचा मृत्यू




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मंगळवेढा :** उमदी येथून खवे (ता. मंगळवेढा) या ठिकाणी दुचाकीवरून येत असताना सोड्डी फाट्याजवळ एका अवजड वाहनाने दिलेल्या धडकेत एका महिलेसह लहान मुलीचा अपघाती मृत्यू झाला. ही घटना सोमवारी (दि. २५) दुपारी पावणेचार वाजता घडली. यात शांता धनाजी बाबर (वय २७, रा. काळेवाडी, ता. मोहोळ) व अनन्या धनाजी बाबर (वय ५) या मायलेकींचा अपघातात मृत्यू झाला. याबाबत पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## आळंदी एकादशी निमित्त पंढरपुरात भाविकांची गर्दी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** कार्तिक महिन्यातील कार्तिक वद्य उत्पत्ती एकादशीनिमित्त पंढरपुरात हजारो भाविकांनी विठ्ठल दर्शनासाठी मोठी गर्दी केली आहे. आजची एकादशी आळंदी एकादशी म्हणून ओळखली जाते. याच एकादशीचा उत्साह पंढरपुरातही आहे. सकाळपासून विठ्ठल मंदिर परिसर, चंद्रभागा नदी प्रदक्षिणामार्ग, महाद्वार, पश्चिमद्वारसह दर्शन रांग ही भाविकांच्या गर्दीने गजबजुन गेली आहे आज विठ्ठलाच्या पदस्पर्श दर्शनासाठी किमान 4 ते 5 तासांचा कालावधी लागतो आहे.

### फडणवीस यांचे राऊत यांना पाठिंब्याचे आश्वासन



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** महाराष्ट्राच्या राजकीय पटावर एक महत्त्वाची घडामोड घडली असून, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी आमदार व बार्शी विधानसभा मतदारसंघातील पराभूत उमेदवार राजेंद्र राऊत यांच्यासोबत बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी राऊत यांना पूर्ण पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले आणि त्यांची भविष्यातील राजकीय वाटचाल सुकर करण्यासाठी साथ देण्याचा विश्वास दिला. देवेंद्र फडणवीस यांनी राऊत यांना उद्देशून म्हटले, "काळजी करू नका राजाभाऊ, आम्ही कायम तुझ्या पाठीशी आहोत."

## संविधान दिनानिमित्त करमाळ्यात सामूहिक बुद्ध वंदना



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**करमाळा :** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकामध्ये आज (मंगळवार, 26 नोव्हेंबर) सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन 74 वा संविधान दिन साजरा करण्यात आला. शेतकरी कामगार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष दशरथ कांबळे, श्री. आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष रमेश कांबळे, दलित सेनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण भोसले, अर्बन बँकेचे मॅनेजर एस. पी. कांबळे, पाटबंधारे विभागाचे उपअभियंता गौतम कांबळे, किसन जानराव, प्रमोद गायकवाड, भीमराव कांबळे, एल. यु. कांबळे, सुनील खरात, संतोष कांबळे, अनिकेत अडसूळ यावेळी उपस्थित होते.

### Public notice

**Notice is** hereby given that one **Mehaboob Jafar Shaikh** (herein after referred to as the said mortgage) have agreed to create mortgage in respected of the G.P.property more particularly described in the schedule hereunder in favor of my/our clinent s, Piramal capital and housing finance ltd br. Pandharpur, Dist. Solapur in respect of the property described herein. That the said property came in the name of **Mehbomb Jafar Shaikh heir of Jafar Mahibubsab Shaikh.** So I have given this notice to all persons having any claim aginst or in respect the said plot property more particularly described in the schedule hereunder or any part there of by way of sale, exchange, mortgage (Equitable or registered or otherwise) Gift, truts, inheritance, family arragement, maintains, bequest partnership, possession, lease sublease tenancy, license, line charge, pledge, easement or otherwise are hereby requested to notify hte same in writing to me/us with supporting documentary evidence at the address mentioned herein below within 14 days from the date hreof, failing whice the claim or claims, if any of such person's or person's will be considered to have been waived and or abandoned and my clinent shall proceed with disbursement of loan and creation of mortgage in respect of thereof.

**DESCRIPTION OF THE PROPERTY**
G.P.Malmatta no.2395 area 1140 sq feet (open and built up) Which is situated at village Sant Damaji Nagar Tal.Mangalwedha Dist.Solapur
East:- Road
South:- Road
West:- Property of Salim Shaikh
North-Property of Daji Ghule
Dt.26/11/2024

Adv. Ranjeet N Shinde
R.NO.MAH/3995/2012
(Panel advocate)
PANDHARPUR

## अधिवक्ता संघाच्यावतीने 'संविधान दिवस' व 'राष्ट्रीय कायदा दिवस' साजरा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** २६ नोव्हेंबर रोजी "संविधान दिवस" व "राष्ट्रीय कायदा दिवस" पंढरपूर अधिवक्ता संघाच्यावतीने पंढरपूर जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश 'श्री.सुरवसेसाो यांच्या अध्यक्षतेखाली बार असोसिएशनच्या कार्यालयात दुपारी 2 वाजता साजरा करण्यात आला. यामध्ये प्रथम भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, त्यानंतर पंढरपूर अधिवक्ता संघातील उपाध्यक्ष महेश कसबे यांनी प्रास्ताविकेचे वाचन करून सर्वांनी संविधानाची शपथ घेतली. यानंतर दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री.चोपडा साो यांनी भारताचे संविधान याबद्दल सखोल असे माहितीपर मार्गदर्शन केले. पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष राजेश चौगुले यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. सचिव अभयसिंह देशमुख यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

या कार्यक्रमास न्यायिक अधिकारी तसेच पंढरपूर अधिवक्ता संघातील सदस्य निकिता अवताडे, गणेश चव्हाण विजयकुमार नागटिळक, विलास शेळके, रेखा यादव मॅडम यांच्यासह सर्व वकील सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बार असोशिएशनचे सभासद यांनी परिश्रम घेतले.

### सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी संकटात

# गुजरात, आंध्र प्रदेश, कर्नाटक राज्यातून डाळिंबाची आवक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** सोलापूर जिल्हा डाळिंब उत्पादनासाठी प्रसिद्ध होता. मात्र गेल्या काही वर्षापासून डाळिंब पिकावर विविध प्रकारच्या किडीचा प्रादुर्भाव होत असल्याने शेतकऱ्यांनी बागा काढून टाकल्या यामुळे आता गुजरात, आंध्र प्रदेश, कर्नाटक येथून सोलापूर जिल्ह्यात डाळिंब येत आहेत. डाळिंबाची आवक जास्त झाली असल्याने दरात घसरण झाली आहे. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

सोलापूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये 64 टन डाळिंबाची आवक झाली आहे. हे डाळिंब गुजरात, आंध्र प्रदेश, कर्नाटक व महाराष्ट्रातील काही भागातून आले आहेत. सध्या कडक थंडी पडत असल्याने डाळिंबास मागणी कमी झाली आहे. मात्र आवक मोठ्या प्रमाणावर असल्याने दरात घसरण झाली आहे. सध्या बाजार समिती येथे 50 ते 110 रुपये किलो दराने डाळिंबाची विक्री होत आहे. दरात घसरण झाली असल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. सोलापूर जिल्हा डाळिंब उत्पादनात अग्रेसर होता. येथील डाळिंब उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात, दिल्ली येथे जात होते. मात्र गेल्या काही वर्षापासून डाळिंबावर किडीचा प्रादुर्भाव होत असल्यामुळे शेतकऱ्यांनी डाळिंबाच्या बागा उकडून टाकल्या आहेत. यामुळे जिल्ह्यात डाळिंबाचे उत्पादन कमी झाले असल्याने परराज्यातून डाळिंब सोलापुरात येत आहेत. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला, माळशिरस, माढा, करमाळा, पंढरपूर या तालुक्यांमध्ये दर्जेदार डाळिंबाच्या बागा होत्या. चांगले डाळिंब असल्यामुळे यास परराज्यातून मागणी येत होती. मोठ्या प्रमाणावर डाळिंबाचे उत्पादन होत असल्यामुळे पंढरपूर येथील कृषी उत्पन्न बाजार समिती येथे प्रत्येक मंगळवारी डाळिंबाचे सौदे बाजार होत होते. डाळिंब खरेदी करण्यासाठी बेंगलोर दिल्ली कलकत्ता येथील व्यापारी येत होते. डाळिंबास चांगला दर मिळत होता. यामुळे शेतकऱ्यांना चांगले उत्पादन मिळत होते. मात्र गेल्या तीन वर्षापासून डाळिंबावर किडीचा प्रादुर्भाव सुरू झाला. यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ लागल्यामुळे शेतकऱ्यांनी डाळिंबाच्या बागा उकडून टाकल्या. यामुळे जिल्ह्यात डाळिंबाचे उत्पादन कमी झाले. यामुळे गुजरात कर्नाटक आंध्र प्रदेश येथून सोलापूर जिल्ह्यात डाळिंब विक्रीसाठी येऊ लागले आहेत. मात्र गेल्या दोन दिवसापासून डाळिंबाची आवक जास्त झाली असल्याने दरात घसरण झाली आहे. 200 ते 300 रुपये किलो मिळणारे डाळिंब 50 ते 100 रुपये किलो पर्यंत मिळू लागले. आहेत यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ लागले आहे. सोलापूर जिल्हा डाळिंब उत्पादनात अग्रेसर होता. मात्र सध्या पर राज्यातून डाळिंब येत असल्याचे दिसून येत आहे. सोलापूर जिल्ह्यात डाळिंब उत्पादन करणारा शेतकरी आता भाजीपाला उत्पादनाकडे वळाला आहे. भाजीपाल्यातून दररोज उत्पन्न मिळत असल्याने शेतकऱ्यांना याचा फायदा होत आहे.

पंढरी संचार

# बादलांच्या राजीनाम्याचा अन्वयार्थ

शिरोमणि अकाली दलाचे अध्यक्ष सुखबीर सिंग बादल यांच्या राजीनाम्यानंतर १०४ वर्षे जुन्या असणाऱ्या या पक्षावरील संकट अधिक गडद झाले आहे. शिरोमणी अकाली दलाची स्थापना १४ डिसेंबर १९२० रोजी झाली. काँग्रेसनंतरचा दुसरा सर्वात जुना पक्ष म्हणून या पक्षाची भारतीय राजकीय इतिहासात नोंद आहे. या पक्षाचे भूतकाळात अनेक वेळा विघटन झाले असून अनेक नेत्यांनी स्वतःचे पक्षही स्थापन केले आहेत. ८० च्या दशकात हा पक्ष अनेक भागांमध्ये विभागला गेला. हा तो काळ होता जेव्हा राज्यात दहशतवाद शिगेला पोहोचला होता. त्यावेळी हा पक्ष अकाली दल लोंगोवाल आणि अकाली दल युनायटेडमध्ये विभागला गेला होता. सिमरनजीत सिंग मान दलाचे अध्यक्ष असताना ही फूट पडली. लोंगवाल गटाचे नेतृत्व संत हरचरण सिंग लोंगवाल यांच्याकडे होते तर अकाली दल युनायटेडचे नेतृत्व जोगिंदर सिंग यांच्याकडे होते. २० ऑगस्ट १९८५ रोजी लोंगोवाल यांचे निधन झाले, त्यानंतर या पक्षाचे नेतृत्व सुरजित सिंग बर्नाला यांच्याकडे आले आणि ८ मे १९८६ रोजी ते शिरोमणी अकाली दल (बरनाला) आणि शिरोमणी अकाली दल (बादल) मध्ये विभाजित झाले. एवढेच नाही तर १९८७ मध्ये एसएडीची तीन गटात विभागणी झाली. पहिला बर्नाला ग्रुप, दुसरा बादल ग्रुप आणि तिसरा जोगिंदर सिंग ग्रुप. ८ मे १९८६ रोजी बादल ग्रुप, युनायटेड आणि अकाली ग्रुप, सिमरनजीत सिंग ग्रुप आणि जोगिंदर ग्रुप एकमेकांमध्ये विलीन झाल; तर तीन वर्षांनी १५ मार्च १९८९ रोजी अकाली दल लोंगोवाल, अकाली दल (मान) आणि अकाली दल (जगदेव सिंग तलवंडी) एकमेकांमध्ये विलीन झाले. यानंतर अकाली दल (बादल) चे सिमरनजीत सिंग मान यांनी वेगळा पक्ष स्थापन केला. त्याला अकाली दल (अमृतसर) असे म्हणतात. हा गट आजही सक्रिय आहे. इतर गटांनी अकाली दल (पंथक) स्थापन केले जे फार काळ काम करत नव्हते. पंजाबचे राजकारण प्रदीर्घ काळ शिरोमणी अकाली दल आणि बादल कुटुंबाभोवती फिरत राहिले आहे. पंजाबचे माजी मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल यांचाही राष्ट्रीय राजकारणात मोठा प्रभाव आणि आदर होता. त्यांना अकाली राजकारणातील बाबा बोहड म्हणजेच वटवृक्ष मानले जायचे. सुखबीर सिंग बादल यांना वडील प्रकाशसिंग बादल यांच्याकडून राजकारणाचा वारसा मिळाला होता, परंतु त्यांचा राजकीय प्रवास हा वादांनी भरलेला आहे. २००९ मध्ये पंजाब विधानसभेचे सदस्य नसतानाही त्यांना पंजाबचे उपमुख्यमंत्री करण्यात आले तेव्हा त्यांच्याविषयीचा पहिला वाद समोर आला होता. सुखबीर सिंग बादल यांनी आपल्या राजकीय प्रवासाला मध्यवर्ती राजकारणातून सुरुवात केली पण ते पंजाबच्या राजकारणात सक्रिय राहिले. शिरोमणी अकाली दल सध्या ज्या अभूतपूर्व संकटातून जात आहे, ते पाहता या पक्षाचे नेतृत्व बादल कुटुंबातील सदस्याकडे राहणार की बाहेरच्या नेत्याकडे पक्षाचे नेतृत्व राहणार, असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. बादल यांचा हा निर्णय पक्षाच्या नेतृत्वाच्या एका वर्गाने केलेल्या बंडाच्या दरम्यान आला आहे आणि त्यांनी शीख धर्मातील धार्मिक अधिकाराचे मुख्य स्थान असलेल्या अकाल तख्तला धार्मिक गैरवर्तनाच्या आरोपांबद्दल त्वरीत निर्णय घेण्याची विनंती केली होती. हे आरोप २००७ आणि २०१७ दरम्यान झालेल्या कथित चुकांशी संबंधित आहेत, ज्याने पंथच्या प्रतिमेला गंभीरपणे नुकसान पोहोचवले आहे आणि शीख हितसंबंधांना हानी पोहोचवली आहे. डेरा सच्चा सौदा प्रमुख गुरमीत राम रहीम सिंग यांच्यावर २००७ च्या ईशनिंदा प्रकरणात आरोप आहेत. सुखबीरसिंग बादल यांच्या राजीनाम्याने अकाली दलाला एका चौरस्त्यावर उभे केले आहे. कारण १९९६ पासून ते या पक्षाचे कुटुंब प्रमुख होते. बादल यांना सतत आव्हानांचा सामना करावा लागत आहे. कारण पक्षाचा प्रभाव झपाट्याने कमी होत आहे.२०२२ च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाची विक्रमी पिछेहाट झालेली पाहायला मिळाली. या निवडणुकीत पक्षाला फक्त तीन जागा मिळाल्या. २०१९ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये या पक्षाला मिळालेल्या मतांची टक्केवारी २७.५ टक्के होती; ती २०२२ मध्ये घसरून १३.४ टक्के झाली. पुढे लोकसभेला राज्यातील १३ जागांपैकी फक्त एक जागा पक्षाने जिंकली. जुलै महिन्यात बीबी जागीर कौर, परमिंदर सिंग धिंडसा, गुरप्रताप सिंग आणि प्रोफेसर प्रेमसिंग चंदूमाजरा यांच्यासह वरिष्ठ नेत्यांनी अकाली दल सुधर लहर या नावाने वेगळा गट स्थापन केला आणि या गटाच्या तक्रारीवरून अकाल तख्त हटवण्यात आला. सुखबीर सिंग बादल यांना पगारदार घोषित करण्यात आले. अकाल तख्तनेही त्यांना राजकीय कार्यात भाग घेण्यास बंदी घातली होती. शिरोमणी गुरुद्वारा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष असलेले प्रकाशसिंग बादल आणि गुरचरण सिंग तोहरा यांच्यात अकाली दलाच्या राजकारणात वर्षानुवर्षे संघर्ष आहे, मात्र बादल कुटुंब तीन दशकांपासून अकाली दलाचे नेतृत्व करत आहे. आता हा पक्ष नव्या आणि बिकट वळणावर आला आहे. तथापि, पंजाबच्या राजकारणातील जाणकार राजीनाम्याला सुखबीर सिंग बादल यांचा मास्टर स्ट्रोक मानत आहेत. फसलेल्या अकाली दलाला बाहेर काढण्यासाठी आणि राजकीय मैदान परत मिळवण्यासाठी सुखबीर सिंग बादल यांनी सांप्रदायिक राजकारण आणि सांप्रदायिक ऐक्याचा आधार घेत हे पाऊल उचलल्याचे मानले जात आहे. सुखबीर सिंग बादल यांना अजूनही शिरोमणी गुरुद्वारा व्यवस्थापन समिती आणि अकाली दलात बहुमत आहे. येणाऱ्या काळात ते आपले राजकीय अस्तित्व कशा प्रकारे टिकवतात हे पाहावे लागेल. ■

> बहुध्रुवीय जगामध्ये आशिया व आफ्रिकेतील उदयोन्मुख अर्थसत्तांना मौलिक भूमिका पार पाडावी लागणार आहे. भारत दक्षिणेकडील या नव्या आकांक्षी देशांचे समर्थ नेतृत्व करीत आहे. भारत आणि नायजेरिया हे दोन्ही देश बहुभाषिक, बहु सांस्कृतिक आणि बहुआयामी आहेत. अशा या बहुसांस्कृतिक राष्ट्रांमध्ये मैत्री व सहकार्याचा नवा अध्याय लिहिला जात आहे.

# भारत-नायजेरिया मैत्रीचा नवा अध्याय

प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर

**प्रस्तावनाः**

नायजेरिया हे या देशाचे नाव तेथे वाहणाऱ्या नायजर या मुख्य नदीच्या नावावरून रूढ झाले आहे. ब्रिटीश वसाहतीमध्ये असताना पत्रकार फ्लोरा शॉ यांनी या भूमीला नायजेरिया नाव दिले. नायजेरिया हे प्रजासत्ताक अटलांटिक महासागराच्या उत्तरेला साहेल आणि दक्षिणेला गिनीचे आखात यांच्यामध्ये वसलेले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पाच दिवसांच्या नायजेरिया, ब्राझिल आणि गयाना दौऱ्यावर आहेत. त्यापैकी त्यांची दोन दिवसांची नायजेरिया भेट महत्त्वपूर्ण ठरली. नायजेरिया लोकसंख्येच्यादृष्टीने आफ्रिकेतील सर्वात मोठा देश. तसेच त्याची अर्थव्यवस्था पहिल्या क्रमांकावर होती. तेथील चलनाच्या अवमूल्यनामुळे नायजेरिया आता दुसऱ्या स्थानावर आहे. भूराजनैतिकदृष्टीने त्याचे विशेष स्थान असल्यामुळे या भेटीचे महत्त्व अनन्य साधारण आहे. १७ वर्षानंतर प्रथमच भारताच्या पंतप्रधानांनी नायजेरियाला भेट दिली. त्यामुळे आफ्रिका खंडातील देशांशी भक्कम आणि दृढतर मैत्री प्रस्थापित करण्याचा भारताचा संकल्प सिद्धीस जात आहे. ही ऐतिहासिक भेट उभय राष्ट्रातील भागीदारी अधिक भक्कम करणारी ठरली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नायजेरियाला भेट देणारे चौथे भारतीय पंतप्रधान आहेत. त्या आगोदर पंडित जवाहरलाल नेहरून, अटलबिहारी वाजपेयी आणि मनमोहन सिंग यांनी नायजेरियाला भेट दिली होती. तसेच सर्वात मोठी उपलब्धी म्हणजे १९६९ साली इंग्लंडच्या राणी एलिझाबेथ दुसरी यांना 'ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द नायजर' हा नायजेरियाचा सर्वश्रेष्ठ पुरस्कार देण्यात आला होता. हा सन्मान नरेंद्र मोदी यांना बहाल करण्यात आला आहे. आतापर्यंत जगातील विविध देशांमध्ये सन्माननीय अशा पुरस्कारामुळे त्यांचे व्यक्तिमत्व अलंकृत झाले आहे. आजवर प्राप्त झालेला त्यांचा हा १७ वा आंतरराष्ट्रीय पुरस्कार आहे. एक सर्वश्रेष्ठ जागतिक नेता या नात्याने त्यांचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. त्यांनी आपल्या भाषणातून भारताच्या नवकल्पना आणि आर्थिक विकासाची झेप या मुद्यावर प्रामुख्याने प्रकाश टाकला.

**विकासातील मौलिक योगदानः**

आफ्रिकेतील एक अत्यंत वेगवान प्रगती करणारे राष्ट्र म्हणून नायजेरिया जगाच्या नकाशावर उदयास येत आहे. १२५ वर्षापूर्वी तेथे भारतीयांनी पाहिले पाऊल टाकले. आता नायजेरियात सुमारे ६०,००० भारतीय नागरिक राहतात आणि त्यांनी नायजेरियाच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे. विशेष म्हणजे २०० भारतीय उद्योग नायजेरियामध्ये प्रस्थापित झाले आहेत. या उद्योगांनी आपल्या बहुमूल्य उत्पादनामुळे नायजेरियाच्या आर्थिक विकासात भर टाकली आहे. नायजेरियन फेडरल सरकारनंतर तेथील तरुणांना रोजगार देणारे भारतीय उद्योग दुसऱ्या क्रमांकावर आहेत. औषधे, रसायने, हॉटेल आणि अतिथ्य उद्योग तसेच आभियांत्रिकी, शिक्षण, पर्यटन, आरोग्य यासारख्या सेवा उद्योगातसुद्धा भारतीयांनी नायजेरियाच्या विकासात चांगलाच हातभार लावला आहे व तेथील सार्वजनिक जीवनात प्रतिष्ठा संपादन केली आहे. नायजेरियात राहणाऱ्या भारतीय समुदायाने मोदी यांचे अबुजा विमानतळावर उत्साही स्वागत केले आणि 'भारत माता की जय!' 'वंदे मातरम्' च्या घोषणांनी 'मोदी, मोदी' असे म्हणत त्यांनी आपल्या लाडक्या नेत्याचे स्वागत केले. नायजेरियात मोठा मराठी समुदाय असून तेथील लाडक्या बहिणींनी पंतप्रधानांच्या स्वागतासाठी समूह स्वरूपात बहारदार लावणी नृत्य सादर केले. मराठीला राजभाषेचा दर्जा प्राप्त करून दिल्याबद्दल तेथील मराठी भाषिकांनी त्यांचे विशेष आभार मानले. निवासी भारतीयांसमोर मोदी यांनी त्यांच्या नेहमीच्या शैलीत केलेल्या मार्गदर्शनात भारताच्या आर्थिक प्रगतीची झेप नोंदविली. भारत दहा वर्षात जगात पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे आणि लवकरच तो तिसऱ्या क्रमांकावर पोहोचेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. डिजिटल भारत, विकसित भारत या कल्पना स्पष्ट करून त्यांनी प्रगत माहिती तंत्रज्ञानाच्या युगात भारताने घेतलेली गरुडझेप स्पष्ट केली. आपल्या आत्मविश्वास व महत्त्वाकांक्षेने भारतीय समुदाय नायजेरियाच्या विकासात मोठे योगदान देत आहे अशा शब्दांत त्यांनी त्यांचे कौतुक केले. त्यामुळे नायजेरियासारख्या देशात राहून त्या देशाच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीमध्ये महत्त्वाचे योगदान देणाऱ्या भारतीयांना हुरुप व उत्साह वाटणे साहजिक आहे.

**रचनात्मक भागीदारीचे पर्वः**

नायजेरिया देश १९६० साली स्वतंत्र झाला. त्यापूर्वी दोन वर्षापासून भारत-नायजेरिया संबंधास सुरूवात झाली. भारत आणि नायजेरिया दरम्यान आर्थिक विकासातील रचनात्मक भागीदारीचे नवे पर्व सुरू झाले आहे. भारत-नायजेरिया दरम्यान परस्परातील सहकार्य मजबूत करण्याच्या उद्देशाने तीन सामंजस्य करारांवर सह्या करण्यात आल्या. त्यामध्ये सांस्कृतिक देवाणघेवाण, सर्वेक्षण सहकार्य आणि सीमाशुल्क निर्धारण सहयोग यांचा समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नायजेरियातील त्यांचे समकक्ष राष्ट्राध्यक्ष बोला अहमद टिनुबू यांच्याशी त्यांनी केलेल्या चर्चेतून फलदायी असे चित्र निर्माण झाले आहे. आजवरच्या परस्पर सहकार्यात भर टाकणाऱ्या नव्या क्षेत्रामध्ये प्रामुख्याने संरक्षण, प्रगत माहिती तंत्रज्ञान, तसेच आरोग्य आणि शिक्षण या सारख्या क्षेत्रामध्ये परस्पर सहकार्याचे अनेकविध प्रकल्प त्यामुळे मार्गी लागणार आहेत. भारत आणि नायजेरियातील धोरणात्मक भागीदारी वाढवून मैत्री नव्या उंचीवर नेण्याच्यादृष्टीने ही भेट महत्त्वपूर्ण ठरली आहे. विशेषतः द्विपक्षीय संबंधात परस्पर विकासाची नवी क्षेत्रे अधिक मजबूतपणे उदयास येत आहेत. उभय देशातील व्यापार आयात-निर्यात वाढविण्याच्यादृष्टीने सुद्धा हे एक महत्त्वाचे दमदार पाऊल ठरणार आहे. विशेषतः भारताने 'ॲक्ट ईस्ट' हे धोरण जसे भक्कमपणे प्रतीत आणले आहे तसेच गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा विकासासाठी 'लुक ॲन्ड ॲक्ट इन आफ्रिका' हा नवा सिद्धांत उदयास येत आहे. राष्ट्रपतींची अल्जेरिया भेट आणि पंतप्रधानांची नायजेरिया भेट यातील सुसंगती लक्षात घेण्यासारखी आहे. आफ्रिकेतील सक्षम देशांकडे भारत मोठ्या अपेक्षेने पहात आहे. कारण त्यांना भारताच्या मदतीची गरज आहे आणि भारतालासुद्धा आपले सामाजिक, आर्थिक, औद्योगिक हितसंबंध जोपासण्यासाठी ही नवस्वतंत्र राष्ट्रे अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. त्यामुळे नायजेरिया दौऱ्याची फलश्रुती ही उत्पादक ठरली असे पंतप्रधानांनी केलेले विधान अर्थपूर्ण आणि तेवढेच दूरदृष्टीचे द्योतक आहे. व्यापार वृद्धी, गुंतवणूक आणि मनुष्यबळ विकासाच्यादृष्टीने तसेच रोजगार निर्मितीसाठी आफ्रिका हे एक नवे उभरते क्षेत्र आहे याचे महत्त्व लक्षात घेऊन भारत या देशाशी असलेले पारंपरिक मैत्रीचे संबंध अधिक भक्कम करीत आहे. त्यादृष्टीने दक्षिण आफ्रिकेनंतर आता भारताने नायजेरियासारख्या पश्चिम आफ्रिकेतील आणखी एका उभरत्या अर्थव्यवस्थेशी सहकार्याचा हात पुढे केला आहे. नॅशनल ब्युरो ऑफ स्टॅटिस्टीक्स म्हणजे राष्ट्रीय सांख्यिकी मंडळाने चौथ्या तिमाहीत दिलेल्या माहितीनुसार, भारताने केलेल्या एकूण निर्यातीपैकी नायजेरियाशी केलेली निर्यात ८.६८ टक्के एवढी आहे आणि आयातीमध्ये तो चौथा देश असून हे प्रमाण ६.४४ टक्के एवढे आहे. याचा अर्थ असा की, निर्यात आणि आयात दोन्हीमध्ये वाढ करण्यासाठी बराच वाव आहे. नायजेरियात २०० भारतीय कंपन्यांची २७ अब्ज डॉलर्स पेक्षा अधिक गुंतवणूक असून या कंपन्या तेथील राष्ट्रीय विकासात महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. व्यापार आणि गुंतवणूक या पलिकडे जाऊन संरक्षण क्षेत्रातील सहकार्याच्याबाबतीत करण्यात आलेला करार ही एक नवी उपलब्धी आहे. भारत-नायजेरिया संबंधातील बदलते परिदृश्य अत्यंत महत्त्वाचे आहे. विशेषतः आफ्रिकेतील विकास आकांक्षी देशांशी मैत्री करून व दृढतर संबंध प्रस्थापित करून २१ व्या शतकातील भारत-आफ्रिका संबंध अधिक सुरक्षित करणे हा या दौऱ्याचा हेतू होता व तो बहुशः सफल झाला आहे असे म्हणावे लागेल. या दौऱ्यानंतर काढलेल्या संयुक्त पत्रकामध्ये उभय राष्ट्रांनी झिरो टॉलरन्स टेररिझम म्हणजे दहशतवाद, चाचेगिरी उच्चाटन तसेच सागर सुरक्षा इत्यादी बाबतीत समसमान भूमिका प्रकट केली आहे. हिंद प्रशांत क्षेत्र आणि हिंदी महासागरात शांतता व सुरक्षेच्यादृष्टीने दोन्ही राष्ट्रे वचनबद्ध आहेत. सबंध जगामध्ये ऊर्जा संकट सोडविण्यासाठी भारत जसा पुढाकार घेत आहे तसेच दक्षिणेकडील देशांच्या विकास प्रश्नाबाबतसुद्धा नायजेरिया व आफ्रिकन देशाच्या मदतीने एक भक्कम अशी फळी निर्माण करीत आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यवस्थेत प्रशासकीय सुधारणा करण्यावर भारताचा भर आहे आणि भारताला संयुक्त राष्ट्रसंघात सुरक्षा परिषदेत कायमस्वरूपी सदस्यत्व मिळावे म्हणून आफ्रिकन राष्ट्रे भारताची बाजू भक्कमपणे घेत आहेत. भारताने संयुक्त राष्ट्रसंघात जेव्हा आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष घोषणेचा ठराव मांडला तेव्हा त्याला नायजेरियाने पाठिंबा दिला होता ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. म्हणजे जागतिक शांतता व विकासाच्यादृष्टीने भारत जे नवनवे उपक्रम आखत आहे. त्याचे आफ्रिकन देश भक्कमपणे समर्थन करीत आहेत ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. जी-२० परिषदेमध्ये भारताने आफ्रिकन युनियनला कायमस्वरूपी सदस्यत्व देण्याचा संकल्प केला, वर तो पूर्ण केला. तसेच आता ब्रीक्स परिषदेत नायजेरियाच्या प्रवेशासाठी भारताने भक्कम समर्थन देऊ केले आहे. ही बाब सुद्धा परस्पर सहकाराच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत. कोविड-१९ महामारीच्या काळात भारताने नायजेरियाला मोफत पुरेशी प्रतिबंधक लस पुरवली. तसेच नायजेरियाला औषधे पुरविणारा भारत हा प्रमुख देश आहे आणि नायजेरिया भारताला कच्च्या क्रूड तेलाचा पुरवठा करीत आला आहे. दरवर्षी भारतामध्ये ५००० नायजेरियन विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ही संख्या आणखी वाढू शकते. ■

गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

## पंचांग

**बुधवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०२४**
कार्तिक कृ. १२,चित्रा, श्री शके १९४६, विक्रम संवत् २०८१, अनलनाम संवत्सर, दक्षिणायन, हेमंत ऋतू शुभ दिवस
नक्षत्र : चित्रा, योग : आयुष्यमान, करण : कौलव
सूर्योदय : स.०६.३४ सूर्यास्त : सायं. ०५.२८ वा.
राहू काळ : राहू काळ : दुपारी : १२:०० ते १:३०

## दिनविशेष

▶१००१: पंजाबचा प्रसिद्ध राजा जयपाल आणि गझनीचा सुलतान महंमद यांच्यातील युद्धात जयपालचा पराभव झाला. ▶१७०१: दशमान पद्धतीने तापमान मोजण्याचे सेल्सियस (पूर्वीचे सेंटिग्रेड) हे प्रमाण निर्माण करणाऱ्या ॲंडिरयस सेल्सियसचा जन्म. ▶१७१३: पुण्याजवळ मांगरी या भावी शाहूमहाराजांनी बाळाजी विश्वनाथ यांना पेशवाईची वस्त्रे दिली. ▶१८५७: मज्जापेशींचे कार्य आणि चेतापेशींचे वेगवेगळे प्रकार उघडकीस आणणाऱ्या चार्ल्स शेरिंग्टन या शास्त्रज्ञाचा जन्म. या संशोधनाबद्दल त्यांना १९३२ चे शरीरशास्त्राचे नोबेल पारितोषिक देण्यात आले▶१८६९: समाजसेवक ठक्कर बाप्पा यांचा जन्मदिन▶१८७०: सुप्रसिद्ध इतिहास संशोधक दत्तात्रय बळवंत पारसनीस यांचा जन्म.▶१८८१: प्रसिद्ध भारतीय प्राच्यविद्या पंडित व हिंदूविधितज्ञ काशीप्रसाद जयस्वाल यांचा जन्म. ▶१९०५: सिन फीन(आहनी आमचे) या आयरिश स्वातंत्र्य चळवळीसाठी झटणाऱ्या पक्षाची स्थापना. ▶१९७६: प्रसिद्ध लेखक ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या स्मृतिदिन

## राशीभविष्य

▲ **मेष** : गैरसमज निर्माण होतील.▲ **वृषभ** : कामानिमित्त प्रवास घडेल. ▲ **मिथुन** : मन:शांती लाभेल. ▲ **कर्क** : ध्येय साध्य होईल.▲ **सिंह** : संसारात त्रास जाणवेल. ▲ **कन्या** : मनाविरुद्ध घटना घडतील. ▲ **तुळ** : समाजकार्यात भाग घ्याल. ▲ **वृश्चिक** : उद्योगात लाभ होईल. ▲ **धनु** : रागावर नियंत्रण ठेवा. ▲ **मकर** : इच्छापूर्ती होईल. ▲ **कुंभ** : मदतीची भावना जोपासा. ▲ **मीन** : मनस्ताप होईल.

## चिंतन

जीवन आणि शिक्षण यातील समन्वय ही आमची मोठीच समस्या आहे. तिची पूर्ती मातृभाषेद्वारे शक्य होईल. मातृभाषाच आमच्या बुद्धी आणि भावनेचा संगम घडवू शकते. पण आपण 'मातृभाषेतून आपल्याला विचार व्यक्त करताच येत नाहीत, असा खोटा अभिमान बाळगतो आणि द्राक्ष आंबट ठरविणाऱ्या कोल्ह्याप्रमाणे त्या भाषेचे दोष काढण्याचा प्रयत्न करतो.

**– रविंद्रनाथ टागोर**

## व्यक्तीविशेष

### पत्रकार गजानन त्र्यंबक माडखोलकर

प्रसिद्ध मराठी कादंबरीकार, समीक्षक आणि पत्रकार गजानन त्र्यंबक माडखोलकर यांचा आज स्मृतिदिन. दि. २८ डिसेंबर १८९९ रोजी मुंबई येथे त्यांचा जन्म झाला. संस्कृत, मराठी आणि इंग्रजी विषयावर त्यांचे प्रभुत्व होते. साहित्यसम्राट केळकरांचे लेखनिक, 'ज्ञानप्रकाश' व 'दै. महाराष्ट्र'चे सहायक संपादक म्हणून त्यांनी काम पाहिले. 'उषा' हा त्यांचा कथासंग्रह. 'देवयानी' हे त्यांचे नाटक तर 'रातराणीची फुले' व 'शुक्राचे चांदणे' हे कथासंग्रह. पंधरा कादंबऱ्या, चौदा समीक्षा ग्रंथ, पाच आत्मचरित्रात्मक पुस्तके अशी त्यांची विपुल साहित्यसंपदा आहे. संस्कृतप्रचुर शब्दकळा आणि पल्लेदार रचनाशैली ही त्यांच्या कादंबरीची वैशिष्ट्ये. पत्रकार, समीक्षक व कथा-कादंबरीकार असणारे माडखोलकर स्वातंत्र्य चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते होते. १९४६ साली बेळगाव येथे झालेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

## बोधकथा

### असे झाले परिवर्तन

रांग बनवताना निधीने वर्गातील राजसचा खसकन हात पकडला आणि त्याला म्हणाली, 'दुसरं तर काही येत नाही. रांगेत उभं राहायचं तरी शिकून घे.' त्यावर तिची दुसरी मैत्रिण म्हणाली, 'उगाचच फी खर्च करतो. शाळेत येणे सोडून दे. पैसे तरी वाचतील.' बिचाऱ्या राजसच्या डोळ्यामध्ये एकदम अश्रू भरून आले. या तिघींना सांगण्यात काही अर्थ नाही. काही बोलले तर उगाच बाईंना खोटं जाऊन सांगतील की, राजस बडबड करत होता. पुन्हा बाईंचा ओरडा खावा लागेल. राजसच्या मनात आधीपासूनच बाईंबद्दल भीती होती. पुन्हा बाईंनी मार दिला किंवा ओरडल्या तर असे वाटत होते. कारण यापूर्वीही त्याने अनेकदा बाईंचा मार खाल्ला होता. अशा प्रकारे सततच्या अपमानामुळे राजसला शाळेत येण्याचे मनच होईनासे झाले. पण शाळेत आलो नाही तर आईबाबा मारतील ही भीतीही होतीच. त्याला असे वाटायचे की, फक्त गणित आणि विज्ञान हे विषय शिकले म्हणजेच आपण मोठे होऊ का? आपण कपिल देव, अमिताभ बच्चन किंवा पीटी उषासारखे इतर क्षेत्रात नाही का मोठे बनू शकत? या सर्व गोष्टी मात्र त्याच्या मनातच राहायच्या. एकदा चाचणी परीक्षेच्या वेळी निधीने पुन्हा त्याला चिडवले, 'काय बुद्धूराम, आज काय करणार परीक्षेत?' त्यावर दुसरी म्हणाली, 'काय शून्यच मिळणार!' हे ऐकून राजसला प्रचंड राग आला आणि त्याच्या तोंडातून एक शिवी निघाली. निधी ते ऐकून पळतच बाईंकडे गेली आणि त्यांना सांगून आली. तिला आता वाटले की राजसला चांगली शिक्षा होणार. मॉनिटरला वाटेल तसे बोलतो काय? बाईंनी त्याला शिवीबद्दल विचारल्यावर, आपल्या दोघी मैत्रिणी लगेचच दुजोरा देतील याची खात्री निधीला होती. (क्रमश:)

## जिज्ञासा

### थोर गणिती पॉल डिरॅक

इंग्लंडमधील ब्रिस्टील या गावी १९०२ मध्ये पॉल अड्रीयन मॉलिस डिरॅक यांचा जन्म झाला. गणितावर निस्सीम प्रेम करणारे पॉल यांनी गणित म्हणजे सौंदर्य असे समीकरण मांडले. वडिलांच्या कडक शिस्तीत वाढलेले पॉल लहानपणापासून अबोल आणि एकलकोंडे होते. त्यांचा हा एकटेपणा गणिताच्या विलक्षण प्रेमामुळे भरून निघत होता. वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी त्यांनी तांत्रिक शिक्षण महाविद्यालयात प्रवेश घेतला. पुढे अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेऊन इलेट्रिकल इंजिनिअर शाखा निवडली. पॉल यांना आइनस्टाईनच्या लेखनाने भुरळ पाडली. अवकाश, काळ, गुरुत्वाकर्षण याबद्दल आकर्षण निर्माण झाल्यानंतर त्या विषयात प्रभुत्व मिळाले. १९२१ मध्ये त्यांनी विशेष प्राविण्यासह पदवी मिळवली. १९२३ मध्ये शिष्यवृत्ती मिळवून गणित आणि पदार्थ विज्ञान विषयात उच्च शिक्षण घेण्यासाठी त्यांनी केम्ब्रिजमध्ये प्रवेश घेतला. तेथे त्या वेळी लार्मर, थॉमसन, रुदरफोर्ड यांसारख्या बड्या संशोधकांचे वास्तव्य तेथे असे. पॉल यांना या सगळ्यांचा सहवास मिळाला. फाऊलर यांच्याकडून त्यांनी ॲटोमिक थिअरी आणि स्टॅटिस्टीकल मेकॅनिक्स या नव्या विषयांचे ज्ञान मिळवले. (पूर्वार्ध)

## सामान्यज्ञान

### प्राण्यांची भविष्यवाणी

पूर्वीच्या काळी बेबीलॉन, ग्रीक आणि रोम संस्कृतीत भविष्य जाणून घेण्यासाठी जनावरांची मदत घेतली जात होती. जीवशास्त्र तज्ज्ञांच्या मतानुसार भविष्यात होणाऱ्या घटनांचे संकेत मिळवण्यासाठी अशा घटनांचा अंदाज घेण्यासाठी बऱ्याचशा जनावरांमध्ये संवेदनशील शक्ती असते. याद्वारे त्यांना कुठल्याही मोठ्या घटनेशी सूचना पहिलेच मिळते. सापंना कुठलाही भुकंप आणि त्सुनामीसारख्या विनाश कारी घटनांबाबत पूर्वसूचना मिळवण्याची क्षमता असते.(क्रमश:)

## सोडवा सुडोकू

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ५११**

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | | 1 | |
| | | | |
| | | 2 | |
| 1 | 2 | 3 | 4 |

**क्रमांक ५१० चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 2 | 1 | 4 | 3 |
| 3 | 4 | 1 | 2 |
| 4 | 3 | 2 | 1 |

## मराठी व्याकरण

संख्याविशेषणांच्या पोटप्रकारातील पहिला प्रकार म्हणजे गणनावाचक संख्याविशेषणे. दहा मुली, चौदा भाषा, साठ रुपये, सहस्त्र किरणे, अर्धा तास, दोघे मुलगे या शब्दांमध्ये दहा, चौदा, साठ, सहस्त्र, अर्धा, दोघे या विशेषणांचा उपयोग केवळ गणती किंवा गणना करण्यासाठी होतो. त्यांना गणनावाचक संख्या विशेषणे म्हणतात. ही विशेषणे अक्षरांनी अथवा अंकांनी अशा दोन प्रकारांनी लिहिता येतात. पहिला वर्ग, चौथा मजला, आठवी इयत्ता, साठावे वर्ष या शब्दांमध्ये पहिला, चौथा, आठवी, साठावे ही विशेषणे वस्तूंचा क्रम दर्शवतात. अशा विशेषणांना 'क्रमवाचक संख्याविशेषणे' असे म्हणतात. प्रथमा, द्वितीया, सप्तमी ही संस्कृतातील क्रमवाचक संख्याविशेषणे मराठीतही वापरतात.

## महिलायन

### आरोग्याचा अनमोल ठेवा

हल्ली कुटुंब लहान झाली आहेत. चौकोनी किंवा त्रिकोणी कुटुंबात दोन किंवा एकच मूल असते. अशा वेळी आई-वडिलांचे सारे लक्ष या मुलांवरच एकवटलेले असते. आपल्या मुलांना घरातच सर्व सुविधा मिळाल्या पाहिजेत या अट्टाहासापोटी मुले लहान वयातच लठ्ठपणाचे शिकार बनतात. मुलांनी मागितले म्हणजे ती वस्तू दिलीच पाहिजे, खाण्यासाठी मागेल ते खाद्यपदार्थ दिले पाहिजे असा एक दृष्टीकोन पालकांचा दिसून येतो. पण अलीकडे फास्ट फूडच्या अतिरेकामध्ये बऱ्याच मुलांमध्ये लठ्ठपणाची तक्रार वाढल्याचे दिसून येते. आपल्या अधिक प्रेम देण्याच्या वृत्तीमुळे बरेचसे पालक मुलांच्या फिटनेसवर लक्ष देत नाहीत. लहानपणी गुटगुटीत बाळ छान दिसते मात्र जसजसे मूल मोठे होऊ लागते तसतसे हे गुटगुटीतपण चिंतेचा विषय ठरू लागते. अनियमित दिनचर्येमुळेच आरोग्यामध्ये हा बिघाड झालेला दिसून येतो. आज शहरांमध्ये ठिकठिकाणी फिटनेस सेंडर आणि वजन कमी करण्याचे क्लिनिक दिसून येते. यावरूनच लोकांमध्ये स्थूलपणाची समस्या किती वेगाने वाढत आहे याचा अंदाज येऊ शकतो. फिटनेस सेंटरमध्ये जाणाऱ्या व्यक्तींमध्ये सर्वाधिक संख्या १४ ते १८ वर्षांच्या किशोरवयीन मुलामुलींची आहे. बऱ्याच फिटनेस तज्ज्ञांनी याबाबत पालकांकडे दोषाचे बोट दाखवल्याचे दिसते. बरेच पालक आपल्या मुलांना जास्तीत जास्त पूरक मिळवण्याच्या नादात चीज, पनीर, याबरोबरच मुलांचा हट्ट म्हणून पिझ्झा, बर्गर यांसारख्या पदार्थांचा मारा सुरू करतात. (पूर्वार्ध)

## बालांगण

### ओळख किल्ल्यांची

#### बिरवाडी किल्ला

रायगड जिल्ह्यातील रोह्याच्या आसपास असलेले अवचितगड, तळागड आणि छोळासगड हे दुर्ग बऱ्यापैकी दुर्गप्रेमींना परिचित आहेत. पण या तीन किल्ल्यांचा पाठचा भाऊ शोभेल असा बिरवाडी किल्ला उर्फ भवानीगड फारसा कोणास माहित नाही. हा किल्ला कुंडलिका नदीच्या दक्षिणेला पूर्व-पश्चिम पसरलेल्या रांगेच्या उपफाट्यावर वसलेला आहे. रोह्याहून या गडाच्या पायथ्याच्या चणेरा गावात जाण्यासाठी बसची सोय आहे. या गडावर सुंदर महादरवाजा, भवानी मंदिर, खांबटाकी, शिवरायांचा पुतळा, बुरूज आणि तटबंदी पाहायला मिळते. या किल्ल्याची उभारणी छत्रपती शिवरायांनी केली. रोह्याकडून सकाळी निघून हा गड पाहून संध्याकाळपर्यंत आरामात परतता येते.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्सः ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ **http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com**

## सर्वोच्च न्यायालयाने मात्र मतचिठ्ठीने निवडणूक घेण्याची मागणी फेटाळली

# ‘ईव्हीएम‘विरोधात महाविकास आघाडीचे मिशन!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सर्वोच्च न्यायालयाने आजच मतचिठ्ठीद्वारे मतदान घेण्याची मागणी फेटाळली असताना महाविकास आघाडीने मात्र राज्यातील निकाल ‘ईव्हीएम’मुळे चुकीचे लागल्याचा आरोप करीत वकिलांची एक फौज उभी करण्याचा तसेच जनजागृती करण्याचा निर्णय घेतला आहे.



विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा दारुण पराभव झाला आहे. आता महाविकास आघाडीच्या वतीने यासाठी ‘ईव्हीएम’ मशीनला दोष देण्यात येत आहे. ‘ईव्हीएम’ मशीनमध्ये गडबड करून भारतीय जनता पक्षाने हा विजय मिळवला असल्याचा दावा काही नेते करत आहेत. त्यातच आता शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेनादेखील ‘ईव्हीएम’ विरोधात मिशन उघडण्याच्या तयारीत आहेत. त्याच वेळी दिल्लीतून काँग्रेसने या मोहिमेला बळ द्यायचे ठरवले आहे. राहुल गांधी आणि मल्लिकार्जून खर्गे यांच्या बैठकीत ‘ईव्हीएम’विरोधात मोहीम उघडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आज राज्यभरातील पराभूत उमेदवारांची बैठक बोलवण्यात आली होती. या बैठकीमध्ये सर्व उमेदवारांना महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यामध्ये ‘ईव्हीएम’ संदर्भातील माहिती गोळा करण्याचे आदेश देण्यात आले असून त्यासाठी वकिलाची एक फौज उभी करण्याची सूचना करण्यात आली आहे. या माध्यमातून कायदेशीर लढाई लढली जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

उद्धव ठाकरे यांच्या पक्षाच्या वतीने राज्यभरातील पराभूत उमेदवारांची एक बैठक बोलण्यात आली होती. या बैठकीतदेखील ‘ईव्हीएम’ मशीनच्या आकडेवारीबद्दल आपापल्या मतदारसंघातून अपडेट माहिती गोळा करण्याचे आदेश पराभूत उमेदवारांना देण्यात आले आहे. आगामी काळात ‘ईव्हीएम’ मशीन विरोधात महाविकास आघाडीच्या वतीने राज्यामध्ये जन आंदोलन उभे करण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर ही माहिती महत्त्वाची असल्याचे मानले जात आहे. ‘ईव्हीएम’ मशीनच्या गडबडीच्या माध्यमातूनच महाविकास आघाडीचा पराभव झाला असल्याचा दावा शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. ‘ईव्हीएम’ मशीन विरोधात आम्ही आजच नाही, तर या आधी पासूनच बोलत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

निवडणुकीची प्रक्रिया चुकीची असणे यापेक्षा दोन दिवस वाया गेलेले चालतील, अशी टीका आव्हाड यांनी ‘ईव्हीएम’वर टीका केली आहे. या विरोधात विरोधकांना विश्वासात घेऊन राज्यात जनआंदोलन उभे करावे लागणार असल्याचे ते म्हणाले. दिल्लीत शेतकऱ्यांचे ज्या पद्धतीने आंदोलन झाले होते. त्या पद्धतीने आंदोलन करावे लागेल, असे ते म्हणाले. काँग्रेसने मतचिठ्ठीवर निवडणूक घेण्याची मागणी करत, देशव्यापी अभियान चलावण्याची घोषणा केली आहे.

### ‘ईव्हीएम’ गोदामात जाऊ द्या

● यासंदर्भात बोलताना खर्गे म्हणाले, की बॅलेट पेपरने निवडणुका व्हाव्यात, अशी आमची इच्छा आहे आणि यासाठी आम्ही ‘भारत जोडो यात्रे’च्या धरतीवर संपूर्ण देशभरात मोहीम चलवू. ओबीसी, एससी, एसटी आणि दुर्बल घटकातील लोक जी मते टाकत आहेत, ती वाया जात आहेत. आमचे म्हणणे आहे, की बॅलेट पेपरद्वारे मतदान करा. त्या लोकांना त्यांच्या घरात मशीन ठेवू द्या. अहमदाबादमध्ये बरीच गोदामे आहेत, त्यांनी तेथे मशिन्स नेऊन ठेवावीत.

## काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजी पुन्हा चव्हाट्यावर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** काँग्रेसच्या या पराभवाची अनेक कारणे समोर येत आहेत. मात्र त्यामध्ये काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजी देखील असल्याचे बोलले जाते. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर देखील काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजी सुरूच असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. निवडणुका झाल्यानंतर आता पुण्यातील काँग्रेसभवन येथील ऑफिसावरून वाद निर्माण झाल्याची माहिती आहे.



विधानसभा निवडणुकीत शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातून मनीष आनंद यांनी काँग्रेसमधून बंडखोरी करीत निवडणूक लढवली होती. यावेळी काँग्रेसकडून पक्षाच्या विरोधात काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर ती कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये काँग्रेसच्या पुणे शहर महिला अध्यक्ष पूजा मनीष आनंद यांचाही समावेश होता. पूजा आनंद यांना पदमुक्त करण्यात आल्यानंतर या ठिकाणी प्रभारी महिला अध्यक्ष म्हणून संगीता तिवारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संगीता तिवारी यांची नियुक्ती झाल्यानंतर काँग्रेस भवन येथील महिला अध्यक्षांसाठी वापरत असलेलं कार्यालय शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसुचित जाती विभागाला देण्यात आले आहे. त्यामुळे सध्या महिला शहर अध्यक्षांकडे कोणतेही कार्यालय राहिलेले नाही.

संगीता तिवारी म्हणाल्या, "पुणे शहर महिला काँग्रेसचे कार्यालय ऐन निवडणुकीमध्ये सुजित यादव यांनी घेतले आणि आम्हा महिला काँग्रेसला बाहेर केले त्याबद्दल सुजित यादव यांचे हार्दिक अभिनंदन. आपल्या महिला सन्मानाला खरंच आमचा सलाम. अशी महिला सन्मान करणारी लोक जर काँग्रेसमध्ये असतील तर खरंच काँग्रेस खूप पुढे जाईल. असे भविष्य आम्हा महिला भगिनींना दिसत आहे," याबाबत पुणे शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही

## गोणीत आढळला अज्ञात महिलेचा मृतदेह; परिसरात खळबळ!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** पुणे द्रुतगती महामार्गालगत झुडपात एका महिलेचा मृतदेह गोणीत आढळून आल्याने खळबळ माजली. शिरगाव फाटा परिसरात साफसफाई करणाऱ्या कामगारांना हा मृतदेह आढळून आला. त्यांनी तत्काळ पोलिसांना याबाबत माहिती दिली, त्यानंतर तळेगाव दाभाडे पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. तसेच महिलेचा मृतदेह शवविच्छेदनासाठी जवळच्या रुग्णालयात पाठवण्यात आला. दोन दिवसांपूर्वी संबंधित महिलेची हत्या करण्यात आल्याची पोलिसांना संशय आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## राज्यात थंडीचा वाढला जोर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात आता हळूहळू थंडीचा जोर वाढू लागला आहे. बांगलच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने महाराष्ट्रावर त्याचा परिमाण होणार आहे. राज्यात तापमानात मोठी घट होताना दिसत आहे. रात्रीची थंडी वाढल्याने अनेक जिल्हे गारठले आहेत.



पुणे, जळगाव, नाशिक, सातारा, कोल्हापूर, सांगली, जळगाव, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया अशा जिल्ह्यांमध्ये तापमानात घट झाली आहे. कमाल तापमानात १ ते २ अंशांनी घट झाली. डिसेंबर महिन्यात आणखी थंडी वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, रात्रीच्या तापमानानंतर काही शहरात कमाल किंवा किमान तापमानात घट होताना दिसत आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या आकडेवारीनुसार, पुण्यात कमाल तापमान २८.४ अंश सेल्सिअस नोंदले गेले होते, जे या हंगामातील सर्वात कमी कमाल तापमान होते, तर किमान तापमान १२.१ अंश सेल्सिअस नोंदवले गेले होते. जे आजपर्यंतच्या हंगामातील सर्वात कमी किमान तापमान आहे.

नोव्हेंबर महिना सुरु झाल्यापासून तापमानात चढ-उतार होत आहे. आता किमान तापमानात घट झाली असून नीचांकी किमान तापमान १२.२ अंश नोंदले गेले होते.

## ✓ » Selected

### नरसय्या आडम मास्तर राजकारणातून निवृत्त

**सोलापूर :** माजी आमदार आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे (माकप) नेते नरसय्या आडम (मास्तर) यांनी संसदीय राजकारणातून निवृत्ती घेणार असल्याची घोषणा केली आहे. सोलापूरमध्ये विधानसभा निवडणुकीत त्यांचा सलग चौथ्यांदा पराभव झाला आहे. त्यानंतर आडम मास्तरांनी हा निर्णय घेतला आहे. आयुष्यभर सामाजिक चळवळीत काम करणारे नेते म्हणून त्यांना ओळखले जाते. यापुढे केवळ पक्षाचा कार्यकर्ता म्हणून निवडणुकीमध्ये सहभागी होणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



### बाल साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी श्रीकांत पाटील

**कोल्हापूर :** मराठा सेवा संघ प्रणित जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेच्या स्थानिक शाखेतर्फे २८ तारखेला महात्मा फुले पुण्यतिथीच्या पर्वावर श्री क्षेत्र गुरुकुंज आश्रम, मोझरीच्या स्मृती मंदिरात बाल साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या सम्मेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कादंबरीकार व बाल साहित्यिक डॉ. श्रीकांत पाटील यांची निवड करण्यात आली आहे. या संमेलनाचे उद्‌घाटन अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्दन बोथे करणार आहेत.



### विद्यार्थ्यांच्या सहलीची बस खड्ड्यात

**नागपूर :** 11 नागपूर येथील सरस्वती हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची सहलीची बस खड्ड्यात कोसळून झालेल्या अपघातात एक विद्यार्थी ठार, तर सुमारे ८ ते १० विद्यार्थी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास एमएच ४०, वाय ७३५० क्रमाकांची सर्वात मागे असलेली बस वळण घेताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने उलटून खड्ड्यात कोसळली.बसमध्ये ५२ विद्यार्थी, एक शिक्षक आणि एक केअर टेकर असे ५४ जण होते. यात अर्ध्यापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना मार लागला. यातील ४४ विद्यार्थी एम्समध्ये तर ७ विद्यार्थी दुसऱ्या दवाखान्यात आहे. एका १५ वर्षीय विद्यार्थिनीचा यात मृत्यू झाला. किरकोळ जखमींना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. लोकांनी अपघातग्रस्त बसमधील विद्यार्थ्यांना मदत केली.

अपघाताची माहिती मिळताच हिंगण्याचे ठाणेदार जितेंद्र बोबडे हे ताफ्यासह घटनास्थळावर पोहचले. त्यांनी जखमी विद्यार्थ्यांना रुग्णालयात नेण्याची व्यवस्था केली. अपघात होताच रस्त्यानी जाणाऱ्यांनी गर्दी केली. त्यामुळे रस्त्यावर वाहनांची गर्दी झाली होती. त्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली होती. सरस्वती माध्यमिक विद्यालयाच्या पाच बस विद्यार्थ्यांना घेऊन वर्धा जिल्ह्यातील बोरधरण येथे जात असताना एक बस देवळी परिसरात खड्ड्यात कोसळली. अपघाताची माहिती मिळताच विद्यार्थ्यांच्या पालकांनी एम्स रुग्णालयात धाव घेतली. अनेक पालक सकाळी रुग्णालयात पोहोचले. आपापल्या मुलाची विचारणा शिक्षकांना करीत होते. त्यामुळे रुग्णालयातही गोंधळ उडाला होता.

## शरद पवार नावाचा अध्याय महाराष्ट्राच्या राजकारणातून संपलाय!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** शरद पवारांनी राजकारणातून स्वेच्छेने निवृत्ती घेण्याची आवश्यकता आहे. तसे पाहिले तर विधानसभा निवडणुकीपूर्वीच निवृत्ती घ्यायला हवी होती. आता विधानसभेत जनतेने तुम्हाला जागा दाखवली आहे. कोलांट्या उड्या मारणारा हा माणूस असून आता हा विषय संपला आहे. शरद पवार नावाचा अध्याय महाराष्ट्राच्या राजकारणातून पूर्णपणे संपला आहे,



असं खळबळजनक विधान भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी केले आहे. शरद पवार म्हणाले होते की, ईव्हीएमवर शंका येऊ नये म्हणून भाजपाने लहान राज्यात पराभव स्वीकारला तर मोठी राज्ये स्वतःकडे ठेवली,अशी टीका शरद पवारांनी केली होती. या टीकेवर गोपीचंद पडळकर यांनी हे विधान केले. लोकसभेत विजय मिळाल्यानंतर महाराष्ट्र महायुतीला जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही, असं शरद पवार म्हणाले होते. याला उत्तर देताना पडळकर म्हणाले की, शरद पवारांवर जनतेचा विश्वास राहिला नाही. शरद पवार नावाचा अध्याय महाराष्ट्राच्या राजकारणातून संपला आहे.

## संविधान हा आपला सर्वात पवित्र ग्रंथ!

पंढरी संचार छायाचित्र सेवा



» **आपली राज्यघटना जिवंत आणि प्रगतीशील दस्तावेज!** संविधान दिनानिमित्त संविधान सदनातील सेंट्रल हॉलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या "हमारा संविधान, हमारा स्वाभिमान" या कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यसभेतील सभागृहनेते जेपी नड्डा, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि राज्यसभेचे उपसभापती हरिवंश उपस्थित होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यासह मंचावर उपस्थित होते.

## मनोज जरांगे बेमुदत उपोषणाला बसणार!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** मराठा आरक्षणासाठी लढणारे कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. आचारसंहिता व निवडणुकांमुळे मनोज जरांगे गेल्या काही दिवसांपासून चर्चेत नव्हते. मात्र, आता त्यांनी मराठा आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा लावून धरण्याचा निर्णय घेतला आहे. जरांगे यांनी नव्या सरकारसमोर आव्हान उभं करायचा निर्णय घेतला आहे. राज्यात नवं सरकार स्थापन झाल्यानंतर मनोज जरांगे पाटील पुन्हा एकादा बेमुदत उपोषणाला बसणार आहेत. त्यांनी काल (२६ नोव्हेंबर) बीड येथे पत्रकार परिषद



घेऊन मराठा समाजाला आवाहन केलं आहे की आपण आंतरवालीत उपोषणाला बसायचं आहे. ते म्हणाले, “सरकार स्थापन झाल्यावर मी तारीख जाहीर करेन. त्या तारखेपासून मी आंतरवाली सराटी येथे बेमुदत उपोषणाला बसणार आहे. तुम्ही देखील या आंदोलनात सहभागी व्हा. मनोज जरांगे पाटील म्हणाले, “आता निवडणूक झाली आहे, तो विषय आपल्यासाठी आता संपला आहे. या निवडणुकीत कोण पडला, कोण निवडून आला हे सगळे विचार मराठ्यांनी आता डोक्यातून बाहेर काढायला हवेत. तुम्हाला हवा असलेला उमेदवार जिंकला नसेल तरी सुतक पाळल्यासारखं वागण्याची आवश्यकता नाही. आपल्याला कशाचे सुतक असण्याचे कारण नाही. आपल्यासाठी निवडणुकीचा विषय आता संपला आहे. तुम्हाला ज्यांना मोठे करायचे होते त्यांना तुम्ही मोठे केलं आहे. कोणी आमदार झाले, त्यातले काहीजण आता मंत्री होतील. त्यांचे व्हायचं ते होईल. ज्याला त्याला जे जे हवे ते ते मिळालं. परंतु, मराठ्यांनो आता तुमचं काय? तुमच्या मुलांचं अस्तित्व काय? तुमच्या मुलांच्या भविष्याचं काय?” असा सवाल केला आहे.

## पोलिसाला दोन लाख देण्याचा हायकोर्टाचा आदेश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राष्ट्रपती पदक मिळालेल्या पोलिस कर्मचाऱ्याची अटक मुंबई उच्च न्यायालयाने एका खुनाच्या गुन्ह्याच्या चुकीच्या तपासामुळे बेकायदेशीर ठरवली आणि त्याला दोन लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्याचे निर्देश महाराष्ट्र सरकारला दिले. याप्रकरणी साताऱ्याच्या अप्पर पोलिस अधीक्षकांविरुद्धही तपास करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

वास्तविक, पीडित पोलीस कर्मचाऱ्याने उच्च न्यायालयात याचिका दाखल करून आपल्यावरील आरोप फेटाळण्यात यावे आणि १० लाख रुपयांची भरपाई द्यावी, अशी मागणी केली होती. पीडित व्यक्ती २००९ मध्ये सातारा जिल्ह्यातील कराड पोलिस ठाण्यात प्रभारी अधिकारी होती. या वेळी त्यांनी एका खुनाचा तपास केला. त्यांची बदली झाल्यानंतर या प्रकरणाचा तपास दुसऱ्या पोलिस अधिकाऱ्याकडे सोपवण्यात आला. २०१२ मध्ये तत्कालीन पोलिस अधीक्षकांनी त्यांना या प्रकरणाशी संबंधित माहिती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयात बोलावले. पाटील कार्यालयात पोहोचल्यावर पोलिसांनी त्यांना तपास व्यवस्थित न केल्याने आणि पुरावे नष्ट केल्यामुळे अटक करण्यात आल्याचे सांगितले. दुसऱ्या दिवशी पाटील यांना रिमांडसाठी न्यायालयात हजर केले असता, त्यांची जामिनावर सुटका करण्यात आली. यानंतर त्याने उच्च न्यायालयात याचिका दाखल करून आपल्याला बेकायदेशीरपणे ताब्यात घेतल्याचा दावा केला.

न्यायमूर्ती ए.एस.चांदूरकर आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या खंडपीठाने याप्रकरणी निकाल देताना सांगितले की, पोलिस अधिकाऱ्याला बेकायदेशीरपणे ताब्यात घेण्यात आले आहे.

## आठ उमेदवारांना लाखाहून अधिक मते

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत मुंबईतील तब्बल आठ उमेदवारांना एक लाखाहून अधिक मते मिळाली आहेत. यामध्ये भाजपच्या पाच, तर शिवसेनेच्या (एकनाथ शिंदे) दोन उमेदवारांचा समावेश आहे. विशेष म्हणजे यात पराभूत झालेल्या उमेदवारांपैकी महाविकास आघाडीचे नसीम खान यांचाही समावेश आहे. या लखपती उमेदवारांमध्ये सगळ्यात प्रथम क्रमांकावर बोरिवलीतील संजय उपाध्याय आहेत. तर उर्वरित उमेदवारांमध्ये मलबार हिलमधून मंगलप्रभात लोढा, मुलुंडचे मिहीर कोटेचा, कांदिवलीचे अतुल भातखळकर, चांदिवलीचे योगेश सागर, चांदिवलीचे दिलीप लांडे



आणि नसीम खान, मागाठाणेमध्ये प्रकाश सुर्वे यांचा समावेश आहे.

विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर आता कोणत्या मतदारसंघावर कोणाचे वर्चस्व याची चर्चा सुरू झाली आहे. शिवसेनेची दोन शकले झाल्यानंतरची ही पहिलीच निवडणूक असल्यामुळे शिवसेनेच्या दोन गटातही वर्चस्वाची लढाई झाली. सगळ्याच पक्षांनी आपापले बालेकिल्ले राखले, मात्र बहुतांशी ठिकाणी विजयी आणि पराभूत उमेदवारांच्या मतांमध्ये फारसा फरक नाही. मात्र मुंबईतील ३६ पैकी सात मतदारसंघांमधील उमेदवारांनी एक लाखांपेक्षाही अधिक मते घेतली आहेत. त्यापैकी चांदिवली या सर्वात जास्त लोकसंख्येच्या मतदारसंघात, तर विजयी आणि पराभूत उमेदवार अशा दोघांनाही एक लाखांपेक्षाही अधिक मते मिळाली आहेत.यामध्ये सर्वाधिक मते बोरिवलीतील भाजपचे उमेदवार संजय उपाध्याय यांना मिळाली आहेत. बोरिवली हा भाजपचा बालेकिल्ला असून या ठिकाणी भाजपचा कोणताही उमेदवार असला तरी तो मोठ्या मताधिक्याने निवडून येतो.

## मुख्यमंत्री पदासाठी राज्यात हालचालींना वेग

# भाजप राज्यात पाठवणार निरीक्षक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क


**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालाला तीन दिवस उलटूनही मुख्यमंत्र्यांच्या नावावर निर्णय होऊ शकला नाही. त्यासाठी भाजप निरीक्षक पाठवणार असून, ते आमदारांचे मत जाणून घेऊन मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा करतील. विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबरपर्यंत होता. नव्या मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीची तारीख अद्याप ठरलेली नाही. तोपर्यंत शिंदे हेच हंगामी मुख्यमंत्री राहतील. शिंदे २८ जून २०२२ ते २६ नोव्हेंबर २०२४ पर्यंत मुख्यमंत्री होते. शिंदे यांच्या राजीनाम्यानंतर मुंबईत भाजप आमदारांची बैठक बोलावण्यात



आली आहे. त्यात फडणवीस यांची नेतेपदी निवड होणार आहे. यानंतर शिंदे, फडणवीस आणि अजित पवार सह्याद्री अतिथीगृहावर पत्रकार परिषद घेऊ शकतात. काही मीडिया रिपोर्टस्नुसार, नवीन मुख्यमंत्रिपदासाठी फडणवीस यांचे नाव जवळपास निश्चित झाले आहे. आजच त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा होऊ शकते. फडणवीस मुख्यमंत्री झाल्यास पूर्वीप्रमाणेच नव्या सरकारमध्येही दोन उपमुख्यमंत्री असतील. राष्ट्रवादीकडून अजित पवार आणि शिवसेनेकडून शिंदे नव्या आमदाराचे नाव पुढे करू शकतात. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नव्या सरकारचा अजेंडा ठरवण्यासाठी तिन्ही पक्षांची एक समिती स्थापन केली जाऊ शकते. त्याचे प्रमुख शिंदे असू शकतात; मात्र शिवसेनेचे प्रवक्ते कृष्णा हेगडे यांनी याचा इन्कार केला.

# विश्ववेध

# शेती करणाऱ्या कैद्यांचे कारागृह



कारागृह म्हटले तर साधारणपणे आपल्यासमोर येते कठोर बंदिस्त भिंती, तारेचे कुंपण, बंद केलेली जागा, खराब जेवण आणि तेथील कैद्यांची जीवनशैली. परंतु, असे एक कारागृह आहे जिथे हे असे काहीच नाही. उलट याठिकाणी कैदी सर्वसामान्य माणसांप्रमाणे राहतात. जिथे कैद्यांना मोकळे वातावरण मिळते, तिथे कैदी फक्त सुधारले जात नाहीत, तर ते आत्मनिर्भर होण्यासाठीही मार्गक्रमण करतात.

या कारागृहात रोज सकाळी सूर्य उगवल्यानंतर कैदी त्यांच्या रोजच्या कामांमध्ये गुंततात. या जेलची पाच एकर जमीन असून, इथे कैदी शेतात कष्ट करतात, मातीत घाम गाळतात, बीज पेरतात, भाज्या वाढवतात. मटर, कारलं, भेंडी, वांगीसारख्या विविध भाज्या त्या जमिनीवर पिकवल्या जातात. हे सर्व करताना त्यांच्या डोळ्यांत आत्मसन्मानाचा भाव दिसतो.

हे केरळमधील तिरुवनंतपुरम जिल्ह्यात असलेले नेट्टकाल्थेरी खुला कारागृह हे राज्यातील शिवाय देशातील पहिले असे कारागृह आहे, जिथे कैद्यांना सुधारण्यासाठी आणि आत्मनिर्भर होण्यासाठी विशेष संधी दिली जाते. ८ ऑगस्ट १९६२ रोजी स्थापन झालेल्या या कारागृहाचे क्षेत्रफळ तब्बल ४७२ एकर असून, येथे सध्या ३६७ कैदी वास्तव्य करतात. हे कारागृह एक साधे कारागृह नाही. इथे कैद्यांच्या पुनर्वसनासाठी आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात त्यांना आणण्यासाठी विविध सुधारणा योजना राबवतात. शारीरिक श्रमासोबतच, मानसिक आरोग्यावरही इथे विशेष लक्ष दिले जाते. कैद्यांना संगणक शिक्षण दिले जाते, वाचनालयात नियमित वाचनासाठी प्रेरित केले जाते आणि योग, ध्यानासारख्या उपक्रमांद्वारे मानसिक शांतता प्राप्त करण्याची संधी दिली जाते. या सर्व गोष्टींनी हे कारागृह विशेष बनवले आहे. कैद्यांच्या मेहनतीने तयार होणाऱ्या उत्पादनांमुळे, कारागृहाला आर्थिक फायदा होत आहे. २०१८ मध्ये, इथल्या शेती उत्पादनांमधून तब्बल दीड कोटी रुपयांची विक्री झाली होती. इथल्या विविध उपक्रमांमुळे कैद्यांच्या जीवनात बदल घडतो आहे आणि ते समाजात पुनर्वसनासाठी सक्षम होत आहेत. ◆◆◆

# सॉरी शब्दाचा अर्थ काय?





आपल्याकडून कळत नकळत काही चूक झाली तर लगेचच दुसऱ्याला सॉरी म्हणून टाकतो. माफ करा या ऐवजी सॉरी हा शब्द अनेकांच्या अंगवळणी पडलेला आहे. पण सॉरी या शब्दाचा फुलफॉर्म किंवा याचा नेमका अर्थ हा अनेकांना माहीत नसतो.

तुम्हाला असं वाटतं असेल की सॉरी या शब्दाचा अर्थ म्हणजे मला माफ करा, माफी असावी असा असेल, पण तसं अजिबात नाही. सॉरी हा शब्दसारिग किंवा सॉरी या इंग्रजी शब्दापासून बनला आहे असं म्हटलं जातं. सॉरी किंवा सारिग या शब्दाचा अर्थ राग येणे किंवा नाराज होणे असा होतो. सॉरी या शब्दाचा फुलफॉर्म खूप कमी जणांना माहीत असेल. इंटरनेटवर उपलब्ध झालेल्या माहितीनुसार सॉरी या शब्दाचा फुलफॉर्म डशेपश ळी ीशरश्रश्रू ीशाालशीळपस्र्ू असा होतो. अर्थातच नेटच्या मायाजालातील या माहितीची पुष्टी करता येत नाही! दक्षिणी ओरेगन युनिव्हर्सिटीतील एडविन बॅटीस्टेला आणि सॉरी अबाऊट देंट : द लँग्वेज ऑफ पब्लिक एपोलॉजी या पुस्तकाच्या लेखिकेने सांगितले की लोक सॉरी शब्दाचा वापर वेगवेगळ्या पद्धतीने करतात. मानसशास्त्रानुसार जी व्यक्ती काही चूक नसताना सुद्धा लगेच सॉरी म्हणतात अशा व्यक्ती दुसऱ्यांचा विश्वास पटकन मिळवतात, पण काहीवेळा सारखं सॉरी म्हणणं मानसीकदृष्ट्या दुर्बल असल्याचं लक्षण मानलं जातं. ◆◆◆

# चार नद्या होतात गायब

भारतात नद्यांची संख्या इतकी आहे की, भारताला नद्यांचा देश म्हणतात. प्रत्येक नदीचे एक वैशिष्ट्य आणि स्टोरी आहे. नद्या वाहत वाहत समुद्रापर्यंत जातात आणि समुद्राला मिळतात, हे आपल्याला माहिती आहे; पण भारतातल्या अशा काही नद्या आहेत, ज्या समुद्रापर्यंत पोहोचतच नाही. मध्येच गायब होतात.

उत्तर प्रदेशातल्या इटावा जिल्ह्यातील जालौनमध्ये पचनद नावाचे हे ठिकाण आहे. या ठिकाणी पाच नद्यांचा संगम होतो. यात यमुना, चंबल, सिंध, कुंवारी आणि पहज नद्यांचा समावेश आहे. यातील इतर नद्या यमुना नदीत मिसळतात. त्यांचे अस्तित्व संपते. पुढे फक्त यमुना नदी एकटीच बाकी राहते, जी गंगा नदीला मिळते. ◆◆◆



# पोषणजादू




पोषण ट्रॅकरमध्ये आपलं स्वागत आहे, असा मेसेज आल्याचं पाहून 'ती' भेदरलीच. वास्तविक गर्भारपणाच्या किंवा स्तनदा माता असण्याच्या काळात आपल्या आणि बाळाच्या योग्य पोषणासाठी सरकारने चालवलेले प्रयत्न पाहून 'ती' आनंदी व्हायला हवी होती. मग नेमकं उलट का झालं? कारण 'ती' अविवाहित होती. हा मेसेज घरातल्यांनी पाहिल्यावर तर कल्लोळच झाला. आता आपल्याला कुठे तोंड दाखवायची सोय उरली नाही, या जाणिवेनं घरातले सगळेच हादरले. कुणाला विचारायला जावं, तरी आफत!

ऐन दिवाळीत डोळ्यापुढे अंधार झाला. गावात फुटणारे फटाके त्रासदायक वाटू लागले. दिवाळीच्या शुभेच्छांसह ही कसली 'गुड न्यूज' आली, जिने फराळाची चवच घालवली? थोड्याच वेळात गावात आणखी एक 'ती' असल्याची माहिती मिळाली. तीही अविवाहित. दोन कुटुंबांमध्ये या मेसेजवरून संवाद झाला. काही वेळानं तिसरं कुटुंब या चर्चेत सहभागी झालं. बघता-बघता अशा मुलींची संख्या वाढत गेली, ज्या अविवाहित असतानाच माता झाल्या होत्या किंवा होणार होत्या. योग्य पोषण मिळण्यासाठी ताजं आणि गरम अन्न खावं, समुपदेशनासाठी आणि बालआरोग्य निरीक्षणासाठी अंगणवाडी केंद्राशी संपर्क साधावा, अशा सूचना त्या गावातल्या तब्बल चाळीस मुलींना मिळाल्या होत्या. कुणीतरी खोडसाळपणा केला असावा, असं म्हणावं तर मेसेज थेट सरकारी कचेरीतून आलेले. धक्क्यातून सावरल्यावर विचार आला, सरकारी कचेरीशीच कुणी खोडसाळपणा केला असेल तर?

उत्तर प्रदेशातल्या वाराणसी जिल्ह्यातलं महलिया नावाचं हे गाव ऐन दिवाळीत वेगळ्याच धामधुमीत गुरफटून गेलं. ग्रामस्थांना प्रश्न पडत गेले, तसा गुंता सुटत गेला. घरात गर्भवती महिला किंवा स्तनदा माता आहे, ही माहिती महिला आणि बालकल्याण विभागाच्या कचेरीला कोण देतं? हे सर्वेक्षण करण्याचं काम तर अंगणवाडी सेविकांचं. सबब, माहिती घेणाऱ्या अंगणवाडी सेविकेची ही चूक असावी, अशा निष्कर्षाप्रत गावकरी पोहोचले. प्रत्यक्षात अविवाहित असणाऱ्या; पण कागदावर गर्भवती दिसणाऱ्या या मुलींनी मग अंगणवाडी सेविकेलाच हा प्रश्न विचारला. काही प्रश्नांना या सेविकेने उत्तरच दिलं नाही, तर काहीजणींशी ती असभ्य भाषेत बोलली. त्यामुळं वेगळाच संशय येऊ लागला. ही 'चूक' नसून 'घोटाळा' असावा असं अनेकांना वाटलं आणि तेच खरं निघालं. मुलींनी आणि पालकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे या प्रकाराची तक्रार केली आणि चौकशीची मागणी केली. चौकशीत लक्षात आलं, की अंगणवाडी सेविकेनं गर्भवती आणि स्तनदा मातांना मिळणाऱ्या पोषण आहरात अपहार करण्यासाठी हे सगळं घडवून आणलं होतं. सहा महिन्यांपासून ती या मुलींच्या नावावर स्वतःच्या कुटुंबाचं 'पोषण' करत होती.

गावातल्या काही मुलींना तिने काही महिन्यांपूर्वी आधार कार्ड मागितलं. कारण विचारल्यावर सांगितलं, की आधार आणि मतदार ओळखपत्र 'लिंक' करायचं आहे. आधार कार्ड महिला आणि बालविकास विभागात नोंदवून घेतली आणि या मुली गर्भवती असल्याचं सांगितलं. प्रत्येक गर्भवतीला दरमहा एक किलो गहू, दीड किलो हरभऱ्याची डाळ आणि अर्धा लिटर तेल दिलं जातं. हा सगळा शिधा अंगणवाडी सेविकाच लंपास करत होती. योजना कुणासाठी आणि पोषण कुणाचं? आपल्याकडे हे वारंवार घडत असतं. फक्त 'ट्रिक्स' बदलतात.

# डिटेक्टिव्ह माश्या



प्रथमग्रासे मक्षिकापातः म्हणजे पहिल्याच घासात माशी पडणं. एखाद्या कामात सुरुवातीलाच विघ्न येणं. 'माशी शिंकणं' या वाक्प्रचाराचा अर्थही जवळजवळ तोच. माश्या मारत बसणं म्हणजे निरुद्योगी बसून राहणं. ज्याच्या तोंडावरची माशीही उठत नाही, तो प्रचंड आळशी किंवा मंद. चांदोमामाला तूप रोटी खायला बोलवावं, तर तुपात नेमकी माशी पडते आणि चांदोबा उपाशी राहतो. एकंदरीत माशीविषयी चांगलं मत असणारा माणूस सापडणं अवघड. का सापडावा? हा कीटक चावत नाही; पण तोंडापुढे गुणगुणत राहून वैताग आणतो. अन्नपदार्थ चुकून जरी उघडा राहिला, तर लगेच त्यावर माशी येऊन बसते आणि सोबत आणलेले विषाणू अन्नात कालवून आपल्याला आजारी पाडते. माश्यांचा उपद्रव काय असतो, हे कचरा डेपोजवळच्या गावांमध्ये जाऊन पाहावं. कचरा डेपो अन्यत्र हलवावा, ही मागणी मान्य होत नसल्यामुळं घरदार सोडून कुटुंब दुसरीकडे स्थायिक झाल्याचीही उदाहरणं सापडतील. अशा या उपद्रवी माश्यांनी पोलिसांना एक गंभीर गुन्हा उघडकीस आणायला मदत केली, हे सांगून पटणार नाही. हे काम श्वानपथकातल्या प्रशिक्षित श्वानांचं. घटनास्थळ हुंगून ते आरोपींपर्यंत पोहोचतात. पण तपासी अधिकाऱ्यांनी जिथं हात टेकले, तिथं त्यांच्या मदतीला माश्या धावल्या. मध्य प्रदेशातल्या जबलपूर जिल्ह्यात घडलेल्या या घटनेनं सगळ्यांच्याच भुवया उंचावल्यात.

## जरा हटके

काकाचा खून करणाऱ्या पुतण्याकडून गुन्ह्याची कबुली घेण्यात पोलिसांना यश आलं ते माश्यांमुळं!

झालं असं, की काका आणि पुतण्या दोघे दारू प्यायला गेले. काकाने दुकानातून बाटली घेतली. एका हॉटेलमधून जेवणाचं पार्सल घेतलं. मग दोघे शेतात जाऊन दारू प्यायले. घरी येताना पुतण्या एकटाच आला. नशेत दोघांची चुकामूक झाली, असं घरातल्यांना वाटलं असावं. पण काका रात्रभर आलाच नाही, तेव्हा कुटुंबीयांनी पोलिसात जाऊन तो बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली. पोलिसांनी शोध घेतला असता शेतात काकाचा मृतदेह सापडला. हा खूनच असावा, असा संशय पोलिसांना आला. त्यामुळं काकाबरोबर असलेल्या पुतण्याकडे अर्थातच पोलिसांनी पहिल्यांदा चौकशी केली. आपल्याला काहीच माहीत नाही, हे पुतण्याचं म्हणणं पोलिसांनाही पटलं, कारण पुतण्या अवघा १९ वर्षांचा. काकाच्या चीजवस्तू गायब झाल्या नव्हत्या, त्यामुळं ही घटना लुटीच्या उद्देशानं झालेली नाही, हे पोलिसांनी ओळखलं. काकाचं कुणाशी वैर नाही, पैशांची देवाणघेवाण नाही... मग खून केला कुणी आणि कशासाठी? पोलिसांनी पुतण्याची पुन्हा चौकशी केली, तेव्हाही तो गप्पच राहिला. पण त्याच्या डोक्यावर घोंगावणाऱ्या माश्यांनी पोलिसांना 'क्लू' दिला. इतर कुणाच्याच दिशेला न जाणाऱ्या माश्या पुतण्याच्याच डोक्यावर का घोंगावत असतील..?

पोलिसांनी पुतण्याला शर्ट काढायला लावला आणि तो फॉरेन्सिक लॅबमध्ये पाठवला. शर्टाला रक्त लागलं होतं; पण ते दिसून येत नव्हतं. मग पोलिसांनी पुतण्याला 'नीट' विचारलं, तेव्हा तो कबूल झाला. दारू आणि पैशांवरून काका-पुतण्यांची भांडणं झाली होती. पुतण्याच्या म्हणण्यानुसार, काकाने त्याला पहिल्यांदा मारलं आणि चिडून पुतण्याने त्याच्यावर लाकडी दांडक्याने प्रहार केला. काका तिथेच गारद झाला. खरंतर अशा घटना बऱ्याचदा घडतात; पण अत्यंत रोगट म्हणून तिरस्करणीय असलेल्या माश्या डिटेक्टिव्ह बनल्या, हे या घटनेचं वैशिष्ट्य!

**एका २५ वर्षीय मतिमंद महिलेवर बलात्काराचे हे प्रकरण आहे. या प्रकरणातील आरोपी पोलिसांच्या ताब्यात होता. घटनेनंतर त्याला तत्काळ अटक करण्यात आली होती; मात्र आरोपीवरील गुन्हा सिद्ध करुन त्याला कठोर शिक्षा देण्याचे आव्हान पोलिसांसमोर होते. याचे कारण पीडित महिला मानसिकदृष्ट्या विकलांग असल्याने न्यायालय तिच्या म्हणण्यावर कसा विचार करणार याबाबत पोलिस संभ्रमात होते. अशा परिस्थितीत पोलिसांनी निष्णात न्यायवैद्यक तज्ज्ञाची मदत घेऊन गुन्हेगाराला त्याच्या गुन्ह्याची शिक्षा दिली.**

## फॉरेन्सिक तज्ज्ञांमुळे मिळाला

# बलात्कारपीडित मतिमंद महिलेला न्याय



तारीख होती १७ मे २०१९.. दुपारची वेळ... ठिकाण कर्नाटकातील बागलकोट जिल्ह्यातील एक छोटेसे गाव. गावात देवळात जत्रा सुरू होती आणि सगळीकडे उत्सवासारखे वातावरण होते. याच गावात राहणाऱ्या मतिमंद महिलेचे कुटुंबही जत्रा पाहण्यासाठी गेले होते. ती घरी एकटीच होती. सायंकाळी चार वाजता त्यांचा मोठा भाऊ जत्रेतून परतला तेव्हा बहिणीची अवस्था पाहून तो हादरला. सदर २५ वर्षीय महिलेवर बलात्कार करण्यात आला होता. तिच्या शरीरावर चाव्याच्या खुणा होत्या.

खरे तर आजवर कुटुंबाने तिला कधीही एकटे सोडले नव्हते; पण त्या दिवशी, कुटुंबातील सदस्य एका तासात परत येऊ, या विचाराने जत्रेला गेले होते. त्यातूनही महिलेचा मोठा भाऊ लवकर घरी परतला, पण तोपर्यंत सदर पीडितेबाबत अनुचित प्रकार घडला होता.

ही बाब पोलिसांना कळवण्यात आली आणि महिलेला तात्काळ बागलकोट येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. पीडितेला चांगलाच धक्का बसला होता. ती कोणाशीही बोलण्याच्या मनःस्थितीत नव्हती. त्यामुळे तिच्याकडून कोणताही सुगावा मिळू शकणार नसल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. दरम्यान, पोलीस अधिकारी महिलेच्या घरी पोहोचले आणि तपासादरम्यान पीडितेचा मोबाईल गायब असल्याचे आढळून आले.

ही बातमी गावात पसरली आणि महिलेवर बलात्कार झाल्याच्या घटनेने खळबळ उडाली. पोलिसांनी पीडितेच्या मोबाईलचे लोकेशन तपासले असता मोबाईलचोर अजूनही त्याच गावात सक्रिय असल्याचे आढळून आले. तात्काळ पोलिस अधिकाऱ्यांनी संपूर्ण गावात शोध सुरू केला आणि लवकरच कळले की पीडितेचा मोबाइल २६ वर्षीय हनुमंत मगंडप्पा वापरत आहे. हनुमंत हा ड्रायव्हर म्हणून काम करायचा. पोलिसांनी त्याला तत्काळ अटक केली.

पोलिस चौकशीत हनुमंतने सदर महिला कोणाला काही सांगणार नाही आणि तिचे कुटुंबीय तक्रार देण्यासही धजावणार नाहीत, असे समजून तिच्यावर बलात्कार केल्याचे उघड झाले. त्यानेच पीडितेचा मोबाईलही चोरल्याचे मान्य केले. अटकेनंतर पोलिसांनी त्याच्याविरुद्ध आरोपपत्र तयार करण्यास सुरुवात केली. आरोपी पोलिसांच्या ताब्यात असला तरी त्याला शिक्षा होण्यात अनेक आव्हाने होती.

पीडित महिला ही मानसिकदृष्ट्या अस्वस्थ होती. त्यामुळे न्यायालयात तिची केस कशी उभी करायची याबाबत पोलीस संभ्रमात पडले होते. आरोपीविरुद्ध कोर्टात भक्कम केस हजर व्हावी, अशी पोलिसांची इच्छा होती. धारवाडच्या एसडीएम कॉलेज ऑफ डेंटल सायन्सेसच्या फॉरेन्सिक विभागाचे प्रमुख प्राध्यापक आशित आचार्य पोलिसांसाठी आशास्थान म्हणून पुढे आले. आशित आचार्य यांनी यापूर्वी अनेक कायदेशीर प्रकरणांमध्ये पोलिसांना मदत केली होती. २०१२ च्या निर्भया सामूहिक बलात्कार प्रकरणात दातांचा फॉरेन्सिक अहवाल देण्यातही आचार्य यांची महत्त्वाची भूमिका होती. पोलिसांनी आचार्य यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांनी केवळ मदतच नाही तर न्यायालयासमोर जबाब देण्याचेही मान्य केले.

## असा लागला छडा

प्रा. आचार्य यांनी पीडितेच्या शरीरावरील चाव्याच्या खुणा आणि आरोपीच्या दातांचा फॉरेन्सिक अहवाल तयार केला. न्यायालयासमोर दिलेल्या जबानीत त्यांनी साधार हे सांगितले की, चाव्याच्या खुणाची छायाचित्रे घेतल्यानंतर आरोपीच्या दातांच्या रचनेशी त्याचे विश्लेषण करण्यात आले. त्यानुसार पीडितेच्या शरीरावरील चाव्याच्या खुणा आणि आरोपीच्या दातांचे वक्र जुळत आहेत.

२१ जुलै २०२३ रोजी बागलकोट न्यायालयाने हनुमंतला जन्मठेपेची शिक्षा सुनावली. कोर्टाने आपल्या निर्णयात म्हटले आहे की, खटल्यातील तथ्ये आणि आरोपीने केलेले घृणास्पद कृत्य लक्षात घेता, त्याच्याबाबत उदारता दाखवता येणार नाही. आरोपींवर कडक कारवाई झाली पाहिजे, जेणेकरून भविष्यात असे कृत्य करण्यास कोणी धजावणार नाही. ◆◆◆

## चोरट्या मार्गाने येणाऱ्या ड्रग्जपैकी चाळीस टक्के स्थानिक बाजारपेठेत

# भारतकडून ड्रग्जची होतेय मोठी निर्यात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतात अंमली पदार्थांच्या तस्करीचा व्यवसाय वाढत आहे. भारतात येणाऱ्या ड्रग्जपैकी ४० टक्के ड्रग्ज स्थानिक बाजारपेठेत वापरले जातात, तर उर्वरित साठ टक्के ड्रग्ज भारतातून अरबस्तान आणि आफ्रिकेत जात आहेत.

'इंटरनॅशनल नार्कोटिक कंट्रोल ब्यूरो' नुसार, भारत हा ड्रग्ज पुरवठ्याचा प्रमुख मार्ग म्हणून उदयास आला आहे. आतापर्यंत युरोप आणि अमेरिका ही सर्वात मोठी खपाची बाजारपेठ मानली जात होती; परंतु अरब देश उदयोन्मुख बाजारपेठ म्हणून उदयास आले आहेत. भारतातून सुमारे २ लाख कोटी रुपयांच्या ड्रग्जचा पुरवठा होतो; मात्र भारतात



'एनसीबी' आणि इतर केंद्रीय संस्था सातत्याने कारवाई करत आहेत. अरब देशांमध्ये सक्रिय असलेले भारतीय आणि पाकिस्तानी गुन्हेगारी सिंडिकेट हे ड्रग्ज तेथे विकतात आणि नंतर आफ्रिकन देशांमध्ये त्यांचा पुरवठा करतात. या व्यवसायातून आफ्रिकेतही नार्को टेरर चालवला जात आहे.

राजकीयदृष्ट्या अस्वस्थ असलेल्या अनेक आफ्रिकन देशांमध्ये ड्रग्जच्या पैशातून सशस्त्र बंडखोरी चालवली जात आहे. जमिनीच्या मार्गाने ड्रग्ज पुरवठा करण्यात अधिक धोका आहे. सागरी मार्गावर फिश ट्रेलर आणि मालवाहू जहाजे वापरतात. गुजरात, महाराष्ट्र आणि केरळचा किनारा. म्यानमार सीमा ओलांडून ईशान्येकडील राज्यांमध्ये अंमली पदार्थांचा पुरवठा होतो. मणिपूरमधील मोरे आणि मिझोराममधील चंपाई ही मोठी केंद्रे आहेत. येथे स्थानिक वापराबरोबरच देशाच्या इतर भागातही त्याचा पुरवठा केला जातो. युरोप आणि अमेरिकेत ख्रिसमस आणि नवीन वर्षाचा सणांचा हंगाम आहे. त्यामुळे ड्रग्जचा वापर वाढतो. ड्रग सिंडिकेट प्रामुख्याने पेडलर्स (किरकोळ पुरवठादार) वर आधारित आहेत. पुरवठ्यानंतर सिंडिकेट पाइपलाइनमधून बाहेर पडतात. ड्रग्जच्या विक्रीतून होणारा नफा पुढे व्यापाऱ्यांना जातो. अलीकडेच ऑस्ट्रेलियन पोलिसांनी भारताशी संबंध असलेले एक मोठे ड्रग्ज रॅकेट पकडले होते. तटरक्षक दलाने सोमवारी बंगालच्या उपसागरात केलेल्या मोठ्या कारवाईत ६ हजार किलोग्राम औषध मेथॅम्फेटामाइन (मेथ) जप्त केले. या वर्षातील ही सर्वात मोठी कारवाई आहे. तसेच, तटरक्षक दलाने एवढ्या मोठ्या प्रमाणात मेथ ड्रग जप्त करण्याची ही पहिलीच वेळ आहे.

### म्यानमारमधील सहा जणांना अटक

● म्यानमारमधील सहा तस्करांनाही अटक करण्यात आली आहे. बंगालच्या उपसागरातील पोर्ट ब्लेअरच्या पूर्वेला सुमारे १५० किमी अंतरावर असलेल्या बॅरेन आयलंडमधील एका माशांच्या ट्रेलरमधून ही ड्रग्ज जप्त करण्यात आली.फेब्रुवारी महिन्यात गुजरातच्या किनारपट्टीवरून ३३०० किलो ड्रग्ज जप्त करण्यात आले होते. अंदमान जप्तीपूर्वी, ही वर्षातील सर्वात मोठी ड्रग्ज जप्ती होती. नोव्हेंबरमध्ये इराणच्या जहाजातून ७०० किलो ड्रग्ज जप्त करण्यात आले होते

## ढिगाऱ्याखालून ११ तासांनी मृतदेह बाहेर; पोलिस आणि महापालिकेच्या पथकाचे मदतकार्य

# ग्वाल्हेरमधील घटना; स्फोटात चार महिला ठार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**ग्वाल्हेर :** सोमवारी आणि मंगळवारी मध्यरात्री शहरातील राठोड कॉलनीत भीषण स्फोट झाला. हा स्फोट इतका भीषण होता, की आजूबाजूची तीन घरे पूर्णपणे कोसळली. निम्मे लोक घरांच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले. पोलिस आणि महापालिकेच्या पथकाने मदतकार्य करून त्यांना बाहेर काढले. या अपघातात आई आणि मुलीसह चार महिलांचा मृत्यू झाला. घरातील स्फोटानंतर तब्बल ११ तासांनी ढिगाऱ्याखाली दबलेल्या दोन महिलांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. दोन जण गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयातून ग्वाल्हेरला पाठवण्यात आले आहे.



तुंच रोडवर असलेल्या कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील राठौर कॉलनीतील मुन्शी राठोड यांच्या घरात रात्री ११.५५ वाजता स्फोट झाला. स्फोट इतका जोरदार होता, की कॉलनीतील लोकांचीच नाही तर आजूबाजूच्या परिसरातील लोकांचीही झोप उडाली. जेव्हा लोक घराबाहेर पडले, तेव्हा त्यांना आजूबाजूला फक्त धुराचे लोट दिसले. दूरवर काहीही दिसत नव्हते; मात्र काही वेळाने धुराचे विरल्याने कॉलनीत राहणारे नागरिक मुन्शी राठोड, बासुदेव राठोड, राकेश राठोड या तिघांचीही घरे पूर्णपणे कोसळली होती. यासह

माहिती मिळताच कोतवाली पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि महापालिकेच्या पथकाने तातडीने ढिगारा हटवण्यास सुरुवात केली. या अपघातात पूजा कुशवाह आणि विद्या देवी या दोन महिलांचा मृत्यू झाला आहे. कृष्णा, सोमवती, सत्यवीर आणि शिव, राजू हे गंभीर जखमी झाले असून त्यांना जिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचारानंतर ग्वाल्हेरला रेफर करण्यात आले आहे. ढिगाऱ्यातून वाचवण्यात आलेल्या लोकांमध्ये एक जोडपे भाडेकरू असल्याचे सांगण्यात येत आहे. ज्यामध्ये पत्नी पूजा कुशवाहाचा मृत्यू झाला, तर पती राजू कुशवाहला ग्वाल्हेरला रेफर करण्यात आले आहे. पोलिस आणि महापालिकेच्या पथकाने घटनेच्या ११ तासांनंतर आई आणि मुलीचे मृतदेह बाहेर काढले. ढिगारा पूर्णपणे हटवल्यानंतरच अजून किती लोक तेथे आहेत हे स्पष्ट होणार असले तरी या ढिगाऱ्याखाली अजून एक ते दोन जण गाडले गेले असावेत असा अंदाज आहे.

### याआधीही स्फोट

● याआधी १९ ऑक्टोबरला शहरातील फिल्म पुरामध्ये गनपावडर स्फोट झाला होता. त्यात आई आणि मुलीचा मृत्यू झाला. यानंतर २४ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील सुमावली शहरात गनपावडरचा स्फोट झाला होता. यात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी घराला भेगा पडल्या आहेत. पोलिसांना या प्रकरणाची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळावरून काही फटाके आणि फटाके बनवण्याचे साहित्य जप्त केले. यासोबतच फटाके बनवणाऱ्या महिलांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांचा शोध सुरू करण्यात आला आहे.

## शक्तीकांत दासांच्या प्रकृतीत बिघाड



**चेन्नई :** रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना चेन्नई येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांची प्रकृती आता स्थिर असून चिंतेचे कारण नाही. दास यांना ॲसिडिटीचा त्रास जाणवला. त्यामुळे त्यांना निरीक्षणासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दास यांची प्रकृती आता चांगली असून येत्या २-३ तासात त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज मिळू शकतो.

# मोदींच्या दौऱ्याआधी चंदीगडमध्ये स्फोट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**चंदीगड :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चंदीगड दौऱ्यापूर्वी सेव्हिल बार आणि लाउंज आणि सेक्टर-२६ मधील डीओरा क्लबच्या बाहेर पहाटे स्फोट झाले. त्यामुळे क्लबबाहेरील काचा फुटल्या. प्रसिद्ध रॅपर बादशाहची सेविले बार आणि लाउंज क्लबमध्ये हिस्सेदारी आहे. माहिती मिळताच सहायक पोलिस आयुक्तांसह पोलिस अधिकारी दाखल झाले. तपासासाठी फॉरेन्सिक टीमलाही पाचारण करण्यात आले होते. घटनास्थळावरून नमुने घेण्यात आले आहेत. बॉम्ब फेकणारा तरुण दुचाकीवरून आल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले आहे.

घटनेत वापरण्यात आलेल्या बॉम्बमध्ये खिळे आणि ज्वलनशील पदार्थ भरलेले होते. घटनास्थळावरून संबंधित वस्तूही जप्त करण्यात आल्या आहेत. देशी बॉम्ब (सुतळी बॉम्ब) फुटले असावेत असा पोलिसांचा अंदाज आहे. पोलिस यंत्रणा खंडणीच्या दृष्टिकोनातूनही तपास करत आहेत. या घटनेचा सीसीटीव्हीही समोर आला आहे. पहाटे ३.१५ वाजता एका तरुणाने क्लबच्या दिशेने बॉम्बसदृश वस्तू फेकली. त्यानंतर मोठा स्फोट झाला. धुराचे लोट उठताच तरुणाने तेथून पळ काढला. पोलिस अधीक्षक दिलबाग सिंग यांनी सांगितले, की पहाटे ३.२५ वाजता आम्हाला नियंत्रण कक्षात माहिती मिळाली होती. आमचे तपास अधिकारी घटनास्थळी गेले. जबाब नोंदवल्यानंतर पोलिस गुन्हा दाखल करणार आहेत. चंदीगडचा ज्या भागात स्फोट झाले ते पॉश क्षेत्र आहे. जवळच भाजी मंडई आहे. अनेक केंद्रीय संस्था जवळपास आहेत. पोलिस लाईन आणि सेक्टर-२६ पोलिस स्टेशनही आहे. हे रेस्टॉरंट रॅपर बादशाहच्या मालकीचे असल्याचे सेव्हिल बार अँड लाउंजच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर नमूद करण्यात आले आहे. बादशाहचा इन्स्टा आयडी देखील सोबत टॅग करण्यात आला आहे. दोन्ही क्लबमध्ये सुमारे ३० मीटर अंतर आहे मुखवटा घातलेले आरोपी सेक्टर-२६ पोलिस ठाण्यातून आले होते. आरोपींनी दुचाकी स्लिप रोडवर उभी केली. प्रथम त्याने सेव्हिल बार आणि लाउंजच्या बाहेर क्रूड बॉम्ब फेकला. यानंतर ते डीओरा क्लबबाहेर बॉम्ब फेकण्यासाठी आले. या दोन क्लबमध्ये सुमारे ३० मीटरचे अंतर आहे. स्फोटानंतर घटनास्थळी खिळे पडलेले आढळून आले. बॉम्बमध्ये त्यांचा वापर झाल्याचा संशय पोलिसांना आहे.

तीन डिसेंबरलाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा चंदीगडमध्ये दौरा आहे.

## चार रेंजर्स ठार; दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे दिले आदेश

# इम्रान खान समर्थक आंदोलनाला हिंसक वळण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**इस्लामाबाद :** पाकिस्तानातील इम्रान समर्थकांनी इस्लामाबादकडे मोर्चा वळवला आहे. पाकिस्तानातील परिस्थिती सतत बिघडत चालली आहे. 'पीटीआय'ने शाहबाज सरकारविरोधात मोठे आंदोलन सुरू केले आहे. माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या सुटकेची मागणी करत शेकडो समर्थक इस्लामाबादमध्ये दाखल झाले आहेत. इम्रान समर्थकांच्या जमावाने पाक रेंजर्सच्या वाहनांना चिरडले आहे. या घटनेत ४ रेंजर्सच्या मृत्यूनंतर परिस्थिती तणावपूर्ण आहे. दरम्यान, दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

इम्रानची पत्नी बुशरा बीबी या आंदोलनाचे नेतृत्व करत आहेत. आंदोलनकर्त्यांना रोखण्यासाठी लष्कर तैनात करण्यात आले आहे. खैबर पख्तूनख्वा आणि बलुचिस्तानमधूनही हजारो लोक इस्लामाबादला पोहोचत आहेत. दिसता क्षणी गोळ्या घालण्याचे आदेश देण्यात आले आहेत. इम्रान खानच्या



अटकेदरम्यान पाकिस्तानातील परिस्थिती तशीच आहे. इम्रान खानची सुटका न केल्यास इस्लामाबादला ओलीस ठेवले जाईल, अशी धमकी इम्रान समर्थकांनी शाहबाज सरकारला दिली आहे. अशांतता आणि दहशतवाद्यांशी कडक कारवाई करण्याचे कडक आदेश जारी करण्यात आले आहेत.

इम्रान समर्थकांनी संसदेवर मोर्चा आणि धरणे आंदोलनाची घोषणा केली आहे. आंदोलकांना रोखण्यासाठी राष्ट्रीय महामार्गावर बॅरिकेड्स लावण्यात आली होती; मात्र इम्रानच्या समर्थकांनी बॅरिकेड्स हटवले. इम्रान समर्थकांना रोखण्यासाठी संवेदनशील भागात गस्त वाढवण्यात आली आहे. खैबर-पख्तूनख्वा येथून हा ताफा इस्लामाबादमध्ये दाखल झाला आहे. अशा परिस्थितीत आंदोलकांना रोखण्यासाठी कलम १४४ लागू करण्यात आले आहे. संवेदनशील भागात इंटरनेट सेवा बंद करण्यात आल्याचे पाकिस्तानच्या गृहमंत्रालयाने जाहीर केले. अधिकाऱ्यांनी शिपिंग कंटेनर्स ठेवून महामार्ग रोखले होते; परंतु लिफ्टिंग उपकरणे आणि इतर जड मशिन्स असलेल्या आंदोलकांनी ते काढून टाकले आणि पुढे गेले.

### चार हजार जणांना अटक

● बुशराच्या घोषणेनंतर पोलिस बाईकवर गस्त घालत आहेत. इस्लामाबादमध्ये घुसलेल्यांना अटक करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आतापर्यंत ४ हजारांहून अधिक लोकांना अटक करण्यात आली आहे.

# अखेर 'रोप वे' विरोधी कृती समितीचे आंदोलन मागे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**जम्मू :** काश्मीरमधील कटरा येथील वैष्णोदेवी 'रोप वे' प्रकल्पाविरोधात सुरू असलेला विरोध सरकारशी चर्चा आणि राज्यपालांच्या आश्वासनानंतर थांबला आहे. मंगळवारी स्थानिक सरकारने या प्रकल्पाला विरोध करणाऱ्या खेचर आणि पालखी चालकांशी चर्चा करून राज्यपाल मनोज सिन्हा यांच्या वतीने आश्वासन दिले.

रियासीचे उपायुक्त विनेश महाजन यांनी आंदोलनकर्त्यांना सांगितले, की त्यांच्या समस्या ऐकून त्यावर तोडगा काढण्यात येईल. यानंतर




खेचर व पालखी चालकांनी आपले आंदोलन १५ डिसेंबरपर्यंत स्थगित केले. या संभाषणात माता वैष्णोदेवी श्राइन बोर्डाचे प्रतिनिधीही उपस्थित होते. यापूर्वी २२ नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या 'रोप वे' प्रकल्पाच्या विरोधाला सोमवारी हिंसक वळण लागले होते. पोलिसांनी आंदोलकांना रोखण्याचा प्रयत्न केला असता जमावाने दगडफेक सुरू केली. या हिंसक आंदोलनात काही लोक जखमीही झाले आहेत.

### आंदोलनाला हिंसक वळण

● सोमवारी आंदोलकांनी वाहनांची तोडफोड केली. या हिंसाचारात एक पोलिस जखमी झाला आहे. हिंसक आंदोलनामुळे पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला होता. सोमवारी झालेल्या निषेध सभेत आंदोलकांनी तोडफोड केली. कामगार संघटनेचे अध्यक्ष भूपिंदर सिंग जामवाल आणि शिवसेनेचे (यूबीटी) प्रदेशाध्यक्ष मनीष साहनी यांनीही 'रोप वे"रोप वे' प्रकल्पाविरोधात चार दिवस चाललेल्या आंदोलनात भाग घेतला. 'रोप वे' प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रत्येक नागरिकाला २० लाख रुपयांची भरपाई देण्याची मागणी त्यांनी केली होती. तसेच बाधित लोकांसाठी पुनर्वसन योजना बनविण्यास सांगितले.

## हिंदू एकता यात्रेच्या वेळी घडला प्रकार

# धीरेंद्र शास्त्रींवर झाला मोबाईल हल्ला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**झाशी :** बागेश्वर धाम प्रमुख धीरेंद्र शास्त्री यांची हिंदू एकता यात्रा उत्तर प्रदेशातील झाशी येथे पोहोचली. या प्रवासादरम्यान एक विचित्र घटना घडली. प्रवासादरम्यान कोणीतरी बाबांवर मोबाईल फेकून मारला. मोबाईलने बाबांच्या गालाला स्पर्श केला; पण बाबांनी ते हलकेच घेतले आणि या घटनेवर आपली प्रतिक्रिया दिली.

हिंदू एकता यात्रेच्या सहाव्या दिवशी बाबा धीरेंद्र शास्त्री आपल्या भक्तांसह पायी जात असताना ही घटना घडली.



बाबा माईकवरून भक्त आणि समर्थकांना संबोधित करत असताना कोणीतरी मोबाईल फेकून मारला. तो बाबांच्या गालावर लागला. यानंतर बाबा म्हणाले, 'आम्हाला कोणीतरी फुलांसह मोबाईल फेकून मारला आहे. आम्हाला मोबाईल सापडला आहे.' या घटनेनंतर बाबांनी गांभीर्याने न घेता हा आपल्या प्रवासाचा एक भाग मानून पुढे जाण्याचा संदेश दिला. धीरेंद्र शास्त्री यांच्या या यात्रेला २१ तारखेरपासून सुरुवात झाली असून आजपर्यंत त्याला जनतेचा मोठा पाठिंबा मिळत आहे. ते झाशीला पोहोचले तेव्हा प्रवासाचा सहावा दिवस होता आणि या वेळी हजारो लोक त्यांच्यासोबत चालत होते.

यात्रा मार्गांवरून जिथे जाईल तिथे भाविकांकडून फुलांनी स्वागत केले जाते. जनतेचा पाठिंबा आणि लोकांचा या यात्रेवर असलेला विश्वास स्पष्टपणे दिसून येत आहे. या यात्रेत काही प्रसिद्ध व्यक्तीही सहभागी झाल्या आहेत. अभिनेता संजय दत्त आणि द ग्रेट खली देखील सहभागी झाले होते.

### बंधुता आणि समता वाढवण्यावर भर

● धीरेंद्र शास्त्री यांची हिंदू एकता यात्रा केवळ धार्मिक एकतेचा संदेश देत नाही, तर समाजात बंधुता आणि समता वाढवण्याचाही प्रयत्न आहे. प्रवासादरम्यान घडलेल्या मोबाईल फेकीच्या घटनेने काही काळ लक्ष वेधून घेतले; पण बाबांनी ते मनावर घेतले नाही.

## संभलच्या जामा मशिदीच्या सर्वेक्षणाच्या वेळी जमावाची चिथावणी

# पोलिसांची शस्त्रे हिसकावून आग लावून मारा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**लखनऊ :** संभल हिंसाचार प्रकरणात पाच जणांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, पोलिसांनी नोंदवलेल्या फिर्यादीची प्रतही समोर आली आहे. जमावामध्ये सुमारे ५० लोक सामील होते आणि त्यांनी हसन, अझीम, सलीम, रिहान, वसीम, अयान यांची नावे सांगितली आणि पोलिसांना त्यांची शस्त्रे हिसकावून त्यांना आग लावून ठार मारण्यास सांगितले. कोणीही पळून जाऊ नये. तेथील जमाव आम्ही मशिदीचे सर्वेक्षण होऊ देणार नाही, मशीद आमची आहे, अशा घोषणा जमाव देत



होता. संभळमध्ये रविवारी हिंसाचार उसळला होता. पोलिसांच्या फिर्यादीनुसार, सुनियोजित कटाचा भाग म्हणून जमावाला भडकवण्यात आले आणि हल्ला करण्यात आला. पोलिसांकडून पिस्तूल, अश्रुधूर आणि काडतुसे लुटण्यात आली आणि जीवे मारण्याच्या उद्देशाने गोळीबार करण्यात आला.

### अखिलेश यांची फिर्यादीवर नाराजी

● समाजवाजी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी समाजवादी पक्षाचे खासदार झिया उर रहमान बुर्के यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या फिर्यादीवर नाराजी व्यक्त करत भाजप सरकारवर निशाणा साधला आहे. सावधगिरी बाळगा असेही त्यांनी सांगितले आहे.

## Selected

### सोफा कारखान्याला आग

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** नवी दिल्लीः उत्तर प्रदेशातील ग्रेटर नोएडा येथील बीटा-२ पोलीस स्टेशन परिसरात असलेल्या सोफा निर्मिती कारखान्यात काल रात्री उशिरा आग लागली. त्यात तीन कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. हा अपघात साइट-४ परिसरातील एका कारखान्यात घडला असून, तिघेही मजूर कारखान्यात झोपले होते. आगीची माहिती मिळताच पोलिस आणि अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले. अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी आल्यानंतर काही वेळातच आग आटोक्यात आणण्यात आली; मात्र तोपर्यंत आत झोपलेल्या तीन कर्मचाऱ्यांचा भाजल्याने मृत्यू झाला होता.

### पत्नी आणि सासूची हत्या करून आत्महत्या

**हरिद्वार :** उत्तराखंडच्या हरिद्वारमध्ये एका व्यक्तीने पत्नी आणि सासूची हत्या केली. यानंतर त्या व्यक्तीने स्वतः आत्महत्या केली. राणीपूर कोतवाली परिसरातील टिहरी विस्थापित कॉलनीत ही हृदयद्रावक घटना घडली आहे. या घटनेत एका व्यक्तीने आधी पत्नी आणि सासूची गोळ्या झाडून हत्या केली आणि नंतर स्वतःही आत्महत्या केली. या दुहेरी हत्या आणि आत्महत्येने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

### पोलिसांशी चकमक; गुन्हेगार जखमी

**लखनऊ :** उत्तर प्रदेशातील मेरठ जिल्ह्यात पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत गुन्हेगार आणि त्याच्या साथीदाराच्या पायात गोळी लागली. त्यानंतर दोन्ही जखमी गुन्हेगार आणि त्यांच्या आणखी एका साथीदाराला अटक करण्यात आली. अतिरिक्त पोलिस अधीक्षक आयुष विक्रम सिंह यांनी सांगितले, की सोमवारी रात्री उशिरा कंकरखेडा पोलिस ठाण्याचे पथक लाला मोहम्मदपूरकडे जाणाऱ्या रस्त्यावर तपास करत होते. तपासादरम्यान इनामदार मोनू उर्फ मोहन गिरी (गाझियाबाद) हा त्याच्या दोन साथीदारांसह दुचाकीवरून येत असल्याची माहिती खबऱ्याकडून मिळाली. मोनू उर्फ मोहन गिरी हा ८ जून रोजी पोहल्ली गावात राहणारा लखन सिंग (२७, रा. लखन सिंग) याचे अपहरण करून त्याला गोळ्या घालून ठार केल्याप्रकरणी वॉन्टेड होता.

### ट्रकखाली चिरडून पाच ठार

**तिरुअनंतपूरम :** कन्नूर येथून लाकूड घेऊन जाणाऱ्या ट्रकवरील चालकाचे नियंत्रण सुटून दुभाजक तोडून रस्त्याच्या कडेला झोपलेल्या लोकांना त्याने चिरडले. या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन मुलांचाही समावेश आहे. या अपघातात ११ जण जखमीही झाले आहेत. मंगळवारी पहाटे ३.५० वाजता हा अपघात झाला. मृतांमध्ये कालियाप्पन (५०), बांगझी (२०), नगाम्मा (३९), जीवन (४) आणि विश्व (१) यांचा समावेश आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवले.



### कौटुंबिक कार्यक्रमासाठी गौतम गंभीर भारतात परतला

भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी दरम्यान मायदेशी परतत आहेत. कॅनबेरा येथे ३० नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या दुसऱ्या सराव सामन्यात तो भारतीय संघासोबत नसेल. मात्र, 6 डिसेंबरपासून होणाऱ्या ॲडलेड कसोटीपूर्वी तो संघात सामील होईल.

"कोहलीला आमची गरज नाही. आम्हाला त्याच्या अनमोल अनुभवाची आवश्यकता आहे. ऑस्ट्रेलियामध्ये तो चार ते पाच वेळा आला आहे. त्यामुळे त्याच्याकडे अमूल्य अशी अनुभवाची शिदोरी आहे."
— जसप्रीत बुमरा




## व्यंकटेश IPLचा तिसरा सर्वात महागडा खेळाडू

# कोणी झिरो तर कोणी हिरो

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** इंदूरचा अष्टपैलू खेळाडू व्यंकटेश अय्यर आयपीएलच्या दुसऱ्या सत्रात म्हणजे २०२३ आणि २०२४ मध्ये त्याच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे चर्चेत होता, पण यावेळी तो त्याच्या मूळ किमतीपेक्षा 11 पटीने जास्त भावाने विकला गेल्याने चर्चेत आहे.

जेद्दाह, सौदी अरेबिया येथे झालेल्या मेगा लिलावात अय्यर, ज्याची मूळ किंमत फक्त 2 कोटी रुपये होती, त्याला KKR ने 23.75 कोटी रुपयांना विकत घेतले. यासह तो आयपीएलमधील तिसरा सर्वात महागडा भारतीय खेळाडू ठरला आहे.
इंदूरचे क्रिकेट तज्ज्ञ राजू सिंह चौहान यांच्या मते, अलीकडच्या काळात त्याची बॅटने केलेली उत्कृष्ट कामगिरी हेच त्याची इतक्या मोठ्या किमतीत विक्री होण्याचे मुख्य कारण आहे.

मेगा लिलावात सर्व 10 संघांनी 639.15 कोटी रुपये खर्च करून एकूण 182 खेळाडूंना खरेदी केले. मेगा लिलावात अनेक खेळाडूंनी आश्चर्य व्यक्त केले आहे, तर काहींनी इतिहास रचला आहे जो कधीच मोडला जाणार नाही. या यादीत स्टार यष्टीरक्षक ऋषभ पंतचेही नाव आहे, ज्याने इतिहास रचला.

ऋषभ पंतला लखनौ सुपर जायंट्सने (एलएसजी) २७ कोटींची बोली लावून विकत घेतले. अशा प्रकारे पंत आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू ठरला. मात्र, पंतला घेतल्यानंतर लखनौ फ्रँचायझीचे मालक संजीव गोयंका म्हणाले की, थोडे जास्त पैसे खर्च झाले. त्याला त्याने ठरवल्यापेक्षा जास्त पैसे खर्च करावे लागले.

वास्तविक, लिलावादरम्यान लखनऊ संघाने ऋषभ पंतसाठी 20.75 कोटींची बोली लावली होती. येथे दिल्ली कॅपिटल्सने (DC) पंतला परत घेण्यासाठी RTM कार्ड वापरले. पंतला त्यांच्या संघात समाविष्ट करण्यासाठी, लखनौने पंतची बोली ६.२५ कोटींनी वाढवली आणि थेट २७ कोटी रुपये केली. अशा स्थितीत दिल्लीने माघार घेतली आणि शेवटी लखनौचा संघ जिंकला. अशा प्रकारे पंतला लखनौ संघाने खरेदी केले.

## वर्ल्ड चेस चॅम्पियनशिप- गुकेश पहिला सामना हरला

### गतविजेत्या डिंग लिरेनकडून पराभव

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सिंगापूर :** भारताचा ग्रँडमास्टर डी गुकेश सिंगापूरमध्ये सुरू असलेल्या जागतिक बुद्धिबळ चॅम्पियनशिपच्या पहिल्या सामन्यात पराभूत झाला आहे. त्याला गतविजेत्या डिंग लिरेनने पराभूत केले. या पराभवानंतर 14 सामने रंगलेल्या सामन्यात भारतीय स्टार्स 0-1 ने पिछाडीवर आहेत. जागतिक बुद्धिबळ चॅम्पियनशिपच्या इतिहासात पहिल्यांदाच दोन आशियाई खेळाडू विश्वविजेते होण्यासाठी एकमेकांविरुद्ध स्पर्धा करत आहेत.

18 वर्षांच्या गुकेशने पांढऱ्या तुकड्यांपासून सुरुवात केली. त्याने खेळाच्या सुरुवातीलाच राजाचे पुढचे प्यादे दोन घरे हलवून चूक केली. लिरेनने 'फ्रेंच डिफेन्स'ने प्रत्युत्तर दिले. विश्वनाथन आनंदने 2001 मध्ये स्पेनच्या ॲलेक्सी शिरोव्हविरुद्ध पहिले जागतिक विजेतेपद जिंकताना जी रणनीती वापरली होती तीच रणनीती गुकेशने स्वीकारली.

गुकेशला 12व्या चालापर्यंत अर्धा तासाचा फायदा होता, परंतु 8 चालींनंतर लिरेनला अतिरिक्त मिनिटे मिळाली, ज्यामुळे त्याने त्याच्या सुरुवातीच्या आव्हानावर मात केल्याचे सिद्ध झाले. यानंतर त्याने जोरदार पुनरागमन करत 42 चालींमध्ये विजय मिळवला.




## ओम घन:श्याम सानपची उत्कृष्ट कामगिरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :**जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे व पुणे जिल्हा मल्लखांब असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या विभागीय शालेय स्पर्धेत अहमदनगर शहराचा खेळाडू ओम घन:श्याम सानप यांने उत्कृष्ट कामगिरी करून पुणे विभागात १९ वर्ष वयोगटांमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला.

या विभागीय स्पर्धेत पुणे,पिंपरी चिंचवड,सोलापूर व नगर शहर आणि ग्रामीणच्या संघांनी सहभाग नोंदवला होता.पुण्याची मक्तेदारी मोडीत काढून प्रथम क्रमांक मिळविणारा ओम अहिल्या जिल्ह्याचा पहिला खेळाडू ठरला आहे.

ओम ची मुंबई येथे होणाऱ्या शालेय राज्य स्पर्धेसाठी निवड झाली आहे.ओम हा पाऊलबुद्धे ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी असून महावीर योगा व मल्लखांब ट्रेनिंग सेंटरचा खेळाडू असून तो उमेश झोटिंग,अप्पा लाढाणे, प्रणिता तरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे. चक्रधर स्वामी प्राथमिक विद्यालयाच्या शिक्षिका क्रांती सानप व राज्य क्रीडा शिक्षक महासंघाचे खजिनदार तथा क्रीडा मार्गदर्शक घनश्याम सानप यांचा तो मुलगा आहे.ओम च्या या यशाबद्दल पाऊलबुद्धे कॉलेजचे प्राचार्य भरत बिडवे,क्रीडाशिक्षक महासंघाचे राज्य अध्यक्ष राजेंद्र कोतकर,जिल्हाध्यक्ष नंदकुमार शितोळे,अमोल काजळे,शरद सानप,प्रसाद सामलेटी,अंबादास शिंदे आदींनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.




# महाराष्ट्राच्या दोन्ही संघाची विजयी सलामी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्राच्या दोन्ही संघाने ४३ व्या कुमार व मुली राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेची विजयी सलामी दिली.

अलिगड (उत्तर प्रदेश) येथील महाराणी अहिल्याबाई होळकर स्पोर्टस स्टेडियमवर सोमवारी सुरू झालेल्या या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत कुमार व मुली गटांमध्ये प्रत्येकी ३० संघाने सहभाग घेतला आहे.

सलामीच्या सामन्यात महाराष्ट्र मुलांच्या संघाने विदर्भावर ३७-२६ असा ११ गुण आणि ५ मिनिटे राखून दणदणीत विजय मिळविला. मुलींच्या गटात महाराष्ट्राने मध्यप्रदेशावर ४०-१२ असा १ डाव आणि २८ गुणांनी धुव्वा उडविला.

मुलांच्या सामन्यात महाराष्ट्र संघाकडून विलास वळवीने २.४० मी. व १.३० मी. संरक्षण आणि आक्रमणामध्ये ४ गुण मिळवले. भरतसिंग वसावेने १.३० मिनिट संरक्षण करताना आक्रमणामध्ये २ गुणांची कमाई केली. कृष्णा बनसोडेने २.५९ मी. संरक्षण केले. आशिष गौतमने नाबाद २.१० आणि १.२० संरक्षण करताना आपल्या धारदार आक्रमणात ८ गुण टिपले. विदर्भ संघाकडून मोहित नेवरेने १.०० मी. संरक्षण केले. शैलेश कोरेटीने १.०० मी. संरक्षण करताना आक्रमणात ६ गुण मिळवले.

मुलींच्या सामन्यात प्रतीक्षा बिराजदारने ३.३० मी. संरक्षण करून आक्रमणात २ गुण मिळवले. अश्विनी शिंदे हिनेही ३.३० मी. संरक्षण करून ४ गुणांची कमाई केली. सुषमा चौधरीने ३.२० मी. संरक्षण करून आक्रमणामध्ये ४ गडी बाद केले. प्रणाली काळेने नाबाद १.१० मी. संरक्षण करून आक्रमणामध्ये १० गुणांची कमाई केली. तन्वी भोसलेने २.४० मी. वेळ नोंदवली.

मध्यप्रदेश संघाकडून अक्षरा मालिनी आणि लक्ष्मीने प्रत्येकी एक मिनिटे वेळ नोंदवली.

## विराग क्रिकेट अकादमी संघाचा उपांत्य फेरीत प्रवेश



### श्रेय असलेकर १०७ धावा ची शतकी खेळी

**पुणे :** बी अ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी यांच्या वतीने आयोजित बी अ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी करंडक 15 वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत विराग क्रिकेट अकादमी संघाने विजयी मालिका कायम राखत उपांत्य फेरीत प्रवेश केला. आंबेगाव येथील क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत श्रेय असलेकर(107धावा) याने केलेल्या शतकी खेळीच्या जोरावर विराग क्रिकेट अकादमी संघाने गुरुकुल क्रिकेट अकादमी संघाचा 189 धावांनी दणदणीत विजय मिळवत उपांत्य फेरी गाठली.

*राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क*



## टायगर्स इलेव्हन संघांचे दोन्ही गटात विजय



**पुणे :** डेक्कन इलेव्हन क्लबच्यावतीने आयोजित दुसऱ्या 'डेक्कन इलेव्हन प्रिमीअर लीग' फुटबॉल स्पर्धेच्या १२ आणि १५ वर्षाखालील गटामध्ये टायगर्स इलेव्हन संघाने आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा सहज पराभव करून आगेकूच केली. कर्वेनगर येथील सेवासदन शाळेच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत १२ वर्षाखालील गटामध्ये राजेश एम. याने केलेल्या एकमेव गोलाच्या जोरावर टायगर्स इलेव्हन संघाने वुल्व्हज् इलेव्हन संघाचा १-० असा सहज पराभव केला. राजेश याने सामन्यामध्ये एकमेव गोल नोंदविताना सर्वोत्कृष्ट खेळाडूचा मान मिळवला. दुसऱ्या सामन्यामध्ये रेवांश कासट याने केलेल्या गोलपूर्ण कामगिरीच्या जोरावर रायनोज् इलेव्हन संघाने डॉल्फिन्स् इलेव्हनचा १-० असा पराभव केला.

*राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क*




## एसएसए, ॲबिशियस क्रिकेट अकादमी संघांचा विजय



**पुणे :** लायन्स क्लब पुणे रहाटणी च्या वतीने आयोजित लायन्स ज्युनियर लीग 13 वर्षाखालील एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत एसएसए, ॲबिशियस क्रिकेट अकादमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून पहिला विजय नोंदवला.

फोर स्टार मैदान हिंजवडी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत पहिल्या सामन्यात आदित्य माने नाबाद 74 धावा 2-19) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर ॲबिशियस क्रिकेट अकादमी संघाने प्राधिकरण जिमखाना संघाचा 92 धावांनी पराभव करत विजयी सुरुवात केली. दुसऱ्या सामन्यात प्रथमेश राऊत(4-19 व नाबाद 100धावा) केलेल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर एसएसए संघाने एस बी क्रिकेट अकादमी संघाचा 8 गडी राखून पराभव केला.

*राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क*



## वीर बागीची भारतासाठी अभिमानास्पद कामगिरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :**वीर साहस बागीने नुकत्याच संयुक्त अरब अमिरातीमधील दुबई येथे झालेल्या वर्ल्ड मेंटल स्पोर्ट्स ऑलिम्पिकस 2024 स्पर्धेमध्ये भारतासाठी 2 सुवर्ण आणि 2 कांस्यपदके पटकावून अभिमानास्पद कामगिरी केली. वीर सोबतच पुण्याच्या स्वानंद भोरे याने कांस्यपदक पटकावले.

वर्ल्ड मेंटल स्पोर्ट्स ऑलिम्पिकस हि स्पर्धा चार वर्षातून एकदा होते. या आधीची स्पर्धा 2016 मध्ये लास वेगास (अमेरिका) येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत यावर्षी, 30 देशांतील 150 हून अधिक स्पर्धकांनी भाग घेतला. यात मानसिक गणिताशी संबंधित सहा विषयांचा अंतर्भाव होता आणि वीरने सर्वच्या सर्व सहा विषयांमध्ये भाग घेतला. वीरने पाच दशांश पर्यंतच्या उत्तरांसह 10 सहा अंकी संख्यांचे अचूक वर्गमूळ व एका मिनिटात दिलेल्या कॅलेंडर वरील अनेक तारखांसाठीच्या दिवसाची गणना करणे. यामध्ये एका मिनिटात 95 तारखा मोजून दोन सुवर्णपदके मिळवली आणि 10 अंकी संख्येच्या 10 बेरीजची 5 अंकी संख्येद्वारे अचूक विभागणी करणे आणि फ्लॅश अंझान मॅरेथॉन-1 ते 0.3 सेकंदांच्या वारंवारतेच्या अंतराने संगणकाच्या स्क्रीनवर फ्लॅश केलेल्या 1 ते 6 अंकी संख्यांची भर घालणे यामध्ये २ कांस्यपदके पटकावली. बिशप्स स्कूल पुणे चा विद्यार्थी आणि साहस बागी व स्वीटी बागी यांचा १२ वर्षांचा मुलगा वीर बागी हा ज्याने मानसिक गणिताच्या चारही श्रेणींमध्ये पदके मिळवणारा एकमेव स्पर्धक ठरला, जी त्याची अष्टपैलूता दर्शवते. पॅडरबॉर्न, जर्मनी येथे नुकत्याच झालेल्या १० व्या मेंटल कॅल्क्यूलेशन वर्ल्ड कप (एम सी डब्लू सी) तसेच बिलेफेल्ड, जर्मनी येथे झालेल्या जुनिअर मेंटल कॅल्क्यूलेशन वर्ल्ड कप (जे एम सी डब्लू सी) वीर बागी ने विशेष प्राविण्य मिळविले होते. वीरच्या या भारतासाठीच्या विशेष कामगिरीबद्दल त्याचे सर्वस्तरातून विशेष कौतुक होत आहे.

## आर्यन्स् ॲकॅडमी, एस्क्वेअर ॲकॅडमी, ट्रिनिटी ॲकॅडमी संघांची विजयी आगेकूच !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एसए-आरके ॲकॅडमी तर्फे आयोजित 'एसए-आरके अजिंक्यपद करंडक' १२ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब क्रिकेट (२५ षटके) स्पर्धेत आर्यन्स् क्रिकेट ॲकॅडमी, एस्क्वेअर स्पोर्टस ॲकॅडमी आणि ट्रिनिटी स्पोर्टस ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत विजयी कामगिरी केली.

मांजरी येथील पीजी क्रिकेट मैदान आणि हांडेवाडी येथील एसए-आरके ॲकॅडमी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत वेदांत गिते याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर आर्यन्स् क्रिकेट ॲकॅडमीने शिरूर स्पोर्टस क्लबचा ५ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा खेळताना शिरूर स्पोर्टस क्लबने १३८ धावांचे लक्ष्य उभे केले होते. वेदांत याने १६ धावांमध्ये ४ गडी टिपून आर्यन्स् संघाकडून चमकदार गोलंदाजी केली. आयुष गोसावी याच्या नाबाद ८५ धावांमुळे हे लक्ष्य आर्यन्स् क्रिकेट ॲकॅडमीने २१.५ षटकात व ५ गडी गमावून पूर्ण केले.



सारांश अत्री | शौर्य तावरे | वेदांत गिते

शौर्य तावरे याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे (नाबाद ४२ धावा आणि २ विकेट) एस्क्वेअर स्पोर्ट्स ॲकॅडमीने पुणे पोलिस बॉईज संघाचा ८ गडी राखून पराभव केला. आणखी एका सामन्यात सारांश अत्री याने केलेल्या ११० धावांच्या जोरावर ट्रिनिटी स्पोर्टस ॲकॅडमीने स्पेशलाईज्ड क्रिकेट क्लिनिकचा १५७ धावांनी सहज पराभव केला.

### ३८ वी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन, रविवार दिनांक १ डिसेंबर रोजी

# यंदाच्या मॅराथॉनची थीम असणार पर्यावरणपूरक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** यंदाची ३८ वी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन २०२४, पुढील रविवारी दिनांक १ डिसेंबर रोजी पहाटे सुरू होणार आहे. अशी माहिती संयोजन समिती विश्वस्त आणि अध्यक्ष ॲड अभय छाजेड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावर्षी या स्पर्धेचे ३८ वे वर्ष आहे. यंदा पर्यावरण पूरक मैराथन ही थीम असून सर्वांना बांबूने बनविण्यात आलेली ट्रॉफी देण्यात येणार आहे.४२.१९५ किमी ची पूर्ण मॅरेथॉन स्पर्धा पहाटे ब्राह्म मुहूर्तावर ३ वाजता सणस मैदानावरून सुरू होईल, त्यानंतर पहाटे ३.३० वाजता हाफ मॅरेथॉन २१.०९७५ किमी, सकाळी ६.३० वा. १० किमीत सेच ७ वा. ५ किमी ची शर्यत ( सर्व रेसेस पुरुष आणि महिला गट) आणि सकाळी ७.१५ वा. ३ किमी ची व्हील चेअर अशा क्रमाने रेसेस सोडण्यात येतील.

स्पर्धा मार्ग : प्रारंभ सणस मैदानात आतील ट्रॅक वरून होईल ,सारसबाग मार्गे महालक्ष्मी चौक उजवी कडे वळून सरळ दांडेकर ब्रीज चौक मार्गे सिंहगड रस्ता, गणेश मळा, विठ्ठलवाडी,आनंद हॉल, नांदेड सिटी चौक ,उजवी कडे वळून नांदेड सिटी मध्ये आत २ किमी जाऊन ( १०.५ किमी अंतर जन) परत याच मार्गे सणस मैदानावर एक फेरी पूर्ण करून दुसरी फेरी घेतील ( पूर्ण मॅरेथॉन साठी). इतर स्पर्धा याच मार्गावर आयोजित केल्या जातील ,त्यांचे टर्निंग पॉईंटस वेगळे असून तेथून धावपट्टू परत सणस मैदानात येऊन स्पर्धा समाप्त करतील.

सणस मैदान आणि संपूर्ण मार्गावर प्रत्येक किमी वर पिण्याचे पाणी, एक डॉक्टर आणि ३ नर्सिंग स्टाफ , १ ॲम्ब्युलन्स यांची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्येक २.५ किमी वर , फिडींग बूथ ,एनर्जी ड्रिंक, फळे, ,स्पंजिंग (वॉटर बूथ )आणि इतर सर्व व्यवस्था " वर्ल्ड ॲथलेटिक्स" आणि भारतीय ॲथलेटिक्स महासंघ ,नवी दिल्ली यांचे नियमां नुसार आणि अटिं नुसार करण्यात आली आहे.

एम्स आंतरराष्ट्रीय संस्थे तर्फे स्पर्धा मार्ग हा मान्यता प्राप्त आहे.

पुणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स संघटनेचे ५० राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय तांत्रिक अधिकारी ,जजेस व वेळाधिकारी , स्पर्धा नियमांनुसार तांत्रिक व्यवस्था पार पाडतील. त्यांची नेमणूक प्रारंभ व अंतिम रेषा, सर्व रेसेचे टर्निंग पॉईंटस वर , स्पर्धा मार्गावर निरीक्षण करणे आणि आंतिम निकाल बनविणे साठी केली जाईल. या स्पर्धेसाठी संपूर्ण मार्गावर इलेक्ट्रॉनिक्स टायमिंग सिस्टीम बसवण्यात येईल. प्रत्येक धावपट्टूच्या स्पर्धा क्रमांकाच्या मागील बाजूस लावण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक्स चीपशी ती जोडली जाईल आणि सर्व खेळाडूंना त्यांचे वैयकतिक टायमिंग दिले जाईल.